सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३१२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ७५ शाळांना घाईगडबडीने अल्पसंख्यांक दर्जा देणाऱ्या अधिकाऱ्यांची खैर नाही

## गडबड करणाऱ्याला सोडणार नाही : मुख्यमंत्र्यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १७ फेब्रुवारी : अजित पवारांच्या निधनानंतर घाईगडबडीने ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याचं प्रकरण अल्पसंख्याक विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अंगलट येण्याची शक्यता आहे. अल्पसंख्यांक विभागात ज्यांने कुणी गडबड केली आहे त्याच्यावर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते.**

अजित पवारांच्या निधनाच्या दिवशीच दुपारी पहिल्या फाईलवर सही करण्यात आल्याचं समोर आलं. त्यानंतर पुढच्या तीन ते चार दिवसात तब्बल ७५ फाईल्सवर सह्या करण्यात आल्याचं दिसून आलं. राज्यात एकीकडे शासकीय दुखवटा सुरू असताना अधिकाऱ्यांनी घाईगडबडीत ७५ शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा दिल्याचं समोर आल्याने गोंधळ उडाला.

या प्रकरणानंतर विरोधी पक्षांनी राज्य सरकारवर टीकेची झोड उडवली. प्रत्येक फाईलमागे २५ लाखांची देवाण-घेवाण झाल्याचा आरोप आमदार रोहित पवारांनी केला. आता या मुद्द्यावरून मुख्यमंत्र्यांनीही भूमिका स्पष्ट केली आहे. ज्या फाईल्सना मंजुरी देण्यात आली होती त्यांना आता स्थगिती देण्यात आली आहे. त्याचसोबत ज्याने ही गडबड केली आहे त्याच्यावर कारवाई करण्याचा इशारा आता मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

दरम्यान, राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांना उपमुख्यमंत्री आणि अल्पसंख्याक मंत्री सुनेत्रा पवारांनी भेटीसाठी बोलावून घेतलं. यावेळी सुनेत्रा पवार यांनी अल्पसंख्याक संस्थानमध्ये सुरू असलेल्या भ्रष्टाचाराची माहिती घेतली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अपघाती निधनाचा आघात झाल्यानं अवघा महाराष्ट्र एकीकडे शोकसागरात बुडाला होता. तर याच परिस्थितीचा गैरफायदा घेत काही अधिकाऱ्यांनी आपल्या बेपर्वाई आणि संधीसाधूपणाचं दर्शन घडवलं. अल्पसंख्याक मंत्री असलेल्या अजित पवारांच्या मृत्यूनंतर तातडीनं राज्यातील ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक



दर्जा दिल्याची धक्कादायक बाब समोर आली. हा धक्कादायक प्रकार उघड केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या निर्णयाला स्थिगिती दिली असून चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेशही दिलेत.

धक्कादायक म्हणजे, यातील पाहिलं प्रमाणपत्र अजितदादांच्या अपघाताच्या दिवशी, २८ जानेवारीला दुपारी ३ वाजून ९ मिनिटांनी दिलं गेलं होतं. या प्रमाणपत्रांना अल्पसंख्यांक विभागाच्या ऑनलाईन सिस्टीममध्ये मंजुरी मिळाली, ती वेळ देखील नमूद आहे. २८ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत देण्यात आलेली अशी ७५ प्रमाणपत्रं उपलब्ध आहेत. राज्यात शासकीय दुखवटा असताना, या शिक्षण संस्थांना मंत्रालयातून गुपचूपपणे अल्पसंख्यांक दर्जा दिला जात होता.

## थोडक्यात...

### सलीम खान यांची प्रकृती खालावली; उपचार सुरु

**मुंबई:** बॉलिवूडचे दिग्गज पटकथालेखक आणि अभिनेता सलमान खानचे वडील सलीम खान यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना मुंबईतील वांद्रे येथील लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी त्यांची तब्येत खालावल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले असून सध्या त्यांच्यावर आयसीयू मध्ये उपचार सुरू आहेत. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच सोशल मीडियावर पापाराझी विरल भयानीने रुग्णालयाबाहेरील एक व्हिडीओ पोस्ट केला, ज्यामध्ये रुग्णालयाबाहेरील हालचाली दिसून येत आहेत. वडिलांच्या प्रकृतीची माहिती मिळताच अभिनेता सलमान खान आपले सर्व काम सोडून तडकाफडकी लीलावती रुग्णालयात पोहोचला. यावेळी सलमानच्या चेहऱ्यावर वडिलांच्या प्रकृतीबद्दलची चिंता स्पष्टपणे जाणवत होती.

### हर्षवर्धन सपकाळांकडून शिवप्रेमींची दिलगिरी

**मुंबई:** राज्यात शिवजयंतीची जल्लोष आणि उत्साहात तयारी सुरू असून शिवप्रेमी, शिवभक्त तयारीला लागले आहेत. मात्र, दोन दिवसांपूर्वी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना शिवाजी महाराजांबद्दल केल्याच्या वक्तव्यावरुन चांगलाच वाद सुरू झाला. भाजप नेते, आमदारांकडून हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर टीका करत काँग्रेसचा खरा चेहरा हाच आहे, काही विशिष्ट समुदायाच्या व्होट बँकेसाठी हर्षवर्धन सपकाळ असं बोलतात असेही सत्ताधाऱ्यांनी म्हटले. मात्र, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला, भाजपने जाणीवपूर्वक खोडसाळपणा केल्याचं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. तसेच, आपल्या वक्तव्याने काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असेही सपकाळ यांनी म्हटले. हर्षवर्धन सकपाळ यांनी शिवाजी महाराजांबद्दल गौरवोद्गार काढताना टिपू सुलतानच्या कार्याचेही कौतुक केले होते. तसेच, शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानसोबत केल्याचं दिसून आलं. मात्र, भाजपने खोडसाळपणा करत चुकीच्या पद्धतीने माझे वक्तव्य पसरवल्याचे सांगत आपल्या वक्तव्याबद्दल हर्षवर्धन सपकाळ यांनी शिवप्रेमीप्रती केली दिलगिरी व्यक्त केली आहे.

### पाकिस्ताननंतर नेपाळचा धुव्वा, भारताची सेमी फायनलमध्ये धडक

**नवी दिल्ली** : भारताने १५ फेब्रुवारीला महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर डबल धमाका केला. टीम इंडियाने सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा धुव्वा उडवला. भारताने पाकिस्तानवर ६१ धावांनी मात करत आयसीसी टी २०ळ वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत आपला सलग आणि एकूण तिसरा विजय मिळवला. भारताने या विजयासह सुपर ८ मध्ये धडक दिली. त्याआधी रविवारी दुपारी मुंबईकर राधा यादव हीच्या नेतृत्वात इंडिया ए वूमन्स टीमने पाकिस्तानला पराभूत करत एमर्जिंग आशिया कप २०२६ स्पर्धेतील विजयाचं खातं उघडलं. त्याआधी महिला ब्रिगेडला यूएई विरुद्ध पराभूत झाल्याने उलटफेरचा सामना करावा लागला होता. इंडियाच्या ए टीमने पाकिस्ताननंतर नेपाळला लोळवलं. महिला ब्रिगेडने मंगळवारी १७ फेब्रुवारीला नेपाळ टीमला पराभूत केलं. इंडिया ए टीमने यासह एमर्जिंग आशिया कप २०२६ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत अर्थात सेमी फायनलमध्ये धडक दिली आहे.

## अजित पवारांच्या दुर्घटनेबाबत सर्वात मोठी अपडेट: एल-३ संभाषणाशी संबंधित माहिती यशस्वीरित्या प्राप्त

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १७ फेब्रुवारी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेबाबत प्रथमच अधिकृत माहिती जाहीर करण्यात आली आहे. विमान अपघात तपास यंत्रणेने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात दुर्घटनेनंतर विमानातील दोन्ही नोंदणी साधनांवर तीव्र आगीचा परिणाम झाल्याचे स्पष्ट केले आहे. ही साधने बराच काळ ज्वाळांमध्ये राहिल्याने त्यांना मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे तपास प्रक्रियेला काही अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असल्याचे यंत्रणेने नमूद केले आहे. तर्कवितर्कांना बळी न पडता अधिकृत तपासावर विश्र्वास ठेवावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, विमानात दोन स्वतंत्र नोंदणी साधने होती. त्यापैकी एकातील एल-३ संभाषणाशी संबंधित माहिती यशस्वीरित्या प्राप्त करण्यात आली आहे. मात्र कॉकपीटमधील संभाषण नोंदवणाऱ्या साधनावर



सखोल तांत्रिक परीक्षण सुरू आहे. हे उपकरण हनीवेल कंपनीनिर्मित असल्याने संबंधित देशातील अधिकृत प्रतिनिधींची मदत मागविण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय निकषांनुसार, पुराव्यावर आधारित तपास करण्यात येत असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तपास प्रक्रियेबाबत चुकीची माहिती पसरवू नये, असे आवाहन यंत्रणेने केले आहे.

विमान दुर्घटनेनंतर सर्वप्रथम शोधले जाणारे साधन म्हणजे ब्लॅक बॉक्स. प्रत्यक्षात त्याचा रंग नारंगी असतो आणि तो दोन भागांमध्ये विभागलेला असतो. एक भाग उड्डाणाशी संबंधित तांत्रिक माहिती साठवतो, तर दुसरा भाग कॉकपीटमधील संभाषण नोंदवतो. या साधनावर आग किंवा पाण्याचा सहसा परिणाम होत नाही, अशी रचना असते. त्यातील बॅटरी सुमारे तीस दिवस कार्यरत राहते आणि त्यातील माहिती अनेक वर्षांनंतरही वापरता येते. त्यामुळे कोणत्याही विमान दुर्घटनेत हे साधन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

विमान दुर्घटना घडल्यानंतर विशेष प्रशिक्षण घेतलेली तपास पथके घटनास्थळी दाखल होतात. विमान वाहतूक महासंचालनालय आणि विमान दुर्घटना तपास यंत्रणा यांच्या माध्यमातून या पथकांची नियुक्ती केली जाते. अनेकदा नौदल किंवा विशेष बचाव पथकांचाही या शोधमोहीमेत सहभाग असतो. दुर्घटनेमागील नेमकी कारणे शोधण्यासाठी ब्लॅक बॉक्समधील माहिती अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे या साधनांच्या स्थितीबाबत आलेली माहिती तपासासाठी निर्णायक मानली जात आहे.

### १८ आणि १९ तारखेला १० राज्यात पावसाची शक्यता; या राज्यांना हवामान विभागाचा इशारा

दिल्ली: देशातील बहुतेक भागात हवामान झपाट्याने बदलत आहे. फेब्रुवारीमध्ये अनेक राज्यांमध्ये मार्चसारखी उष्णता जाणवत आहे. तापमान सातत्याने वाढत आहे, परंतु पावसाचा कालावधी देखील सुरू होणार आहे. भारतीय हवामान विभागाने (खचऊ) १७, १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी १० राज्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवली आहे.

हवामान खात्याच्या मते, १७ आणि १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पश्र्चिम हिमालयीन प्रदेश आणि उंचावर असलेल्या भागात हलका ते मध्यम पाऊस आणि हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे. वायव्य भारतातील मैदानी भागात हलका पाऊस आणि गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. १८ फेब्रुवारीपर्यंत सकाळच्या वेळी ओडिशाच्या काही भागात दाट धुके पडू शकते. ज्या राज्यांसाठी पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे, त्यात उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर, लडाख, मध्य प्रदेश, राजस्थान, अंदमान आणि निकोबार बेटे आणि तामिळनाडू यांचा समावेश आहे.

१८ फेब्रुवारी रोजी मेरठ, मुझफ्फरनगर, सहारनपूर, बागपत, शामली, गाझियाबाद आणि नोएडा येथे हलका पाऊस किंवा रिमझिम पाऊस पडण्याची शक्यता आहे . तसेच, संपूर्ण राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलेला नाही. उत्तराखंडमध्ये १७ आणि १८ फेब्रुवारी रोजी चमोली, रुद्रप्रयाग, अल्मोडा, पिथोरागड, बागेश्र्वर, चंपावत आणि उधमसिंग नगर जिल्ह्यात पाऊस पडण्याची शक्यता आहे. १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी उंचावर पाऊस आणि हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे. पर्वतीय प्रदेशांमध्ये बर्फवृष्टीचे परिणाम आधीच जाणवत आहेत.

## स्मार्ट मीटर बसविण्यात महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १७ फेब्रुवारी :** ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे ८७.५७ लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला असून राज्याच्या या यशात महावितरणची ८५.८५ लाख स्मार्ट मीटरसह प्रमुख कामगिरी आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात ऊर्जा परिवर्तन चालू आहे. सौर कृषी पंप बसविण्यासह विविध बाबतीत महाराष्ट्राने देशात ऊर्जा क्षेत्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे. आता स्मार्ट मीटर बसविण्यातही महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आले आहे.

शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट ८० पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. त्याच प्रमाणे औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे. राज्यात ९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

स्मार्ट मीटर बसविण्याच्या बाबतीत दि. १० फेब्रुवारीपर्यंतच्या ताज्या आकडेवारीनुसार ८७.५७ लाख स्मार्ट मीटरसह महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून बिहार (८६.४४ लाख) व उत्तर प्रदेश (८२.७५ लाख) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत.

विजेचा वापर कोणत्या वेळेला झाला त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला टाईम ऑफ डे (टीओडी) सवलत म्हणतात. स्मार्ट मीटरमध्ये अशा प्रकारे वेळेनुसार वीजवापर मोजण्याची सुविधा आहे व ग्राहकांनाही त्यांच्या मोबाईल फोनमधील ॲपमध्ये दर तासाला आपल्या घरात अथवा कार्यालयात किती वीज वापर होत आहे, हे समजते. स्मार्ट मीटरमुळे घरगुती ग्राहकांनाही टीओडी सवलत सुरू केली आहे.

## २५ फेब्रुवारीला स्वीकृत नगरसेवकांची होणार घोषणा !

### महायुतीचे ६, ठाकरे ३ तर काँग्रेसच्या एका नगरसेवकाचा समावेश

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १७ फेब्रुवारी :** स्वीकृत नगरसेवक होण्यासाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांसाठी गोड बातमी असून २५ फेब्रुवारीला स्वीकृत नगरसेवकांची महापालिका सभागृहात घोषणा करण्यात येणार आहे. यात महायुतीचे ६, ठाकरे ३ तर काँग्रेसच्या एका नगरसेवकाचा समावेश आहे. त्यामुळे कोण नगरसेवक बनणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.लाल

मुंबई महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवकांची संख्या पाच वरून दहा करण्यात आले आहे. त्यामुळे स्वीकृत नगरसेवक होण्याचे अनेकांचे स्वप्न साकार होणार आहे. स्वीकृत नगरसेवकांची घोषणा समिती सदस्यांच्या घोषणेपूर्वी होईल असे वाटत होते. परंतु ही घोषणा येत्या २५ फेब्रुवारीला होणार असल्यामुळे स्वीकृत नगरसेवकांचे समिती सदस्य जाण्याचे स्वप्न अधुरे राहणार आहे.



पण नगरसेवक बनायला मिळणार यामुळे इच्छुकांमध्ये खुशीचे वातावरण आहे. पण नेमकं कुणाला स्वीकृत नगरसेवक मिळणार हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. महायुतीला सहा स्वीकृत नगरसेवक असल्यामुळे त्यांच्या पक्षात दोन डझन पेक्षा जास्त माजी नगरसेवकांसह वरिष्ठ पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.

अन्य पक्षातही इच्छुकांची संख्या मोठी असल्यामुळे पक्ष कशाप्रकारे निर्णय घेणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. महायुतीच्या कोट्यामधून राष्ट्रवादी काँग्रेसला एक स्वीकृत नगरसेवक हवे आहे. परंतु दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसला समिती सदस्य पद देण्यात आल्यामुळे त्यांना स्वीकृत नगरसेवक मिळणार नसल्याचे बोलले जात आहे.

शिवसेना ठाकरे गटाच्या वाटणीला तीन स्वीकृत नगरसेवक आले आहेत. यातील एक स्वीकृत नगरसेवक मिळावे यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा ठाकरे गटावर दबाव येत आहे. मात्र ठाकरे गटाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सध्या मनसेमध्ये नाराजी दिसून येत आहे. ठाकरे गटामध्ये ही स्वीकृत नगरसेवक होण्यासाठी अनेकजण गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत. काँग्रेसच्या वाट्याला एक नगरसेवक पद आल्यामुळे येथे कोणाची वर्णी लागणार हे सर्वस्वी मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड ठरवणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### स्वीकृत नगरसेवकांचे अधिकार वाढणार !

स्वीकृत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार नसल्यामुळे त्यांना शक्यतो समिती सदस्य पदावर घेतले जात नाही. त्यामुळे त्यांना मतदानाचा अधिकार मिळावा, यासाठी राज्य सरकारकडे मागणी करण्यात आली आहे. राज्याच्या नगर विकास विभागानेही जादा अधिकार देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे स्वीकृत नगरसेवकाचे अधिकार वाढणार आहेत.

## मोबाईलमधील ओटीपीमुळे होणाऱ्या ऑनलाइन चोरीला आळा बसणार

**नवी दिल्ली :** ऑनलाइन फसवणूक, बनावट कॉल्स आणि ओटीपीच्या गैरवापरामुळे होणाऱ्या आर्थिक चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. अनेकदा पार्सल डिलिव्हरी आणि फूड ऑर्डरच्या नावाखाली सायबर भामटे ग्राहकांकडून ओटीपी मिळवतात आणि काही क्षणांत बँक खातं रिकामं करतात.

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून Bharti Airtel ने 'फ्रॉड अलर्ट' ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित नवी सुरक्षा प्रणाली सुरू केली आहे. ही यंत्रणा संशयास्पद कॉल आणि बँकेचे ओटीपी एकाच वेळी आल्यास ग्राहकांना सतर्क करते, त्यामुळे ऑनलाइन फसवणूक होण्याआधीच धोका टळू शकतो.

**एअरटेलची 'फ्रॉड अलर्ट'**

### एअरटेलने सुरु केली 'फ्रॉड अलर्ट' प्रणाली

**प्रणाली नेमकी काय आहे?**

AI वर आधारित सुरक्षा प्रणाली आहे. ग्राहकांच्या मोबाईलवर संशयास्पद कॉल सुरू असताना जर बँकेचा ओटीपी आला, तर ही प्रणाली लगेच अलर्ट देते आणि संभाव्य फसवणुकीबाबत सावध करते.

**ही यंत्रणा कशी काम करते?**

-ही प्रणाली थेट नेटवर्क स्तरावर काम करते. सायबर भामट्यांची हालचाल ओळखून ती:

- संशयास्पद व्यवहार शोधते
- ओटीपीचा गैरवापर होण्याआधी सूचना देते
- ग्राहकाला विचार करण्यासाठी वेळ देते
- फसवणूक होण्याआधीच हस्तक्षेप करते

म्हणजेच चोरी होण्याआधीच रोखण्याचा प्रयत्न करते.

ओटीपीद्वारे फसवणूक कशी होते?

-बहुतेक वेळा डिलिव्हरी बॉय, कुरिअर किंवा तातडीच्या सेवेच्या नावाखाली कॉल येतो. त्याच वेळी बँकेचा ओटीपी येतो. घाईत ग्राहक तो ओटीपी सांगतो आणि काही सेकंदांत पैसे गायब होतात नव्या एअरटेल प्रणालीमुळे अशा वेळी मोबाईलवर इशारा दिसतो.

**एअरटेलने हा निर्णय का घेतला?**




एअरटेलचे एमडी आणि सीईओ शाश्वत शर्मा यांच्या मते, डिजिटल व्यवहार सुरक्षित ठेवणे हे एअरटेलचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ओटीपी ही सुरक्षा असली तरी त्याचाच गैरवापर वाढत असल्याचे लक्षात आल्यावर AI चा वापर करून ही नवी यंत्रणा विकसित करण्यात आली.

**ही सुविधा सध्या कुठे उपलब्ध आहे?**

हरियाणा राज्यात ही सेवा आधीच सुरू झाली आहे. पुढील दोन आठवड्यांत देशभरातील सर्व एअरटेल ग्राहकांना ही सुविधा मिळणार आहे.

**याआधी एअरटेलने 'फ्रॉड' थांबवण्यासाठी कोणत्या सुविधा सुरु केल्या होत्या?**

-गेल्या दोन वर्षांत एअरटेलने:

- स्पॅम कॉल वॉर्निंग
- धोकादायक लिंक ब्लॉकिंग
- AI आधारित फ्रॉड डिटेक्शन

अशा अनेक सुविधा सुरू केल्या आहेत. 'फ्रॉड अलर्ट' हे त्याच सुविधेचे सर्वात प्रगत व्हर्जन मानले जात आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सोयगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधी शासनाकडून उपलब्ध करून देवू : आमदार सत्तार



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १६ फेब्रुवारी :** सोयगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक तो निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देवू असे प्रतिपादन आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले. शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा सुरळीत मिळाव्यात, यासाठी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि प्रकाश व्यवस्था या बाबींना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सोयगाव नगरपंचायतच्या प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावर शॉपिंग कॉम्पेक्स बांधकाम करणे व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानंतर्गत नवीन पाणी पुरवठा योजना ३ वार्डमध्ये कार्यान्वित करणे या कामांचा शुभारंभ आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकरराव (आबा) काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र राठोड,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,देविदास पालोदकर, नगराध्यक्षा आशाबी तडवी,गटनेते अक्षय काळे,नगरसेवक संतोष बोडखे,कदीर शहा,गजानन कुडके,राजू दुतोंडे,हर्षल काळे,दीपक पगारे,भगवान जोहरे,लतिफ शहा,किशोर मापारी,अशोक खेडकर,शेख रौफ,विष्णू इंगळे,बाबू चव्हाण,दारासिंग चव्हाण,मोतीराम पंडित, उस्मान पठाण, सलीम पठाण,एलीयस पठाण,सोपान पाटील,शिव आप्पा चोपडे,सांडू तडवी,राधेश्याम जाधव,फिरोज पठाण,मुक्तार शेख, भीमा बोराडे, शेख जाकेर,बाळू पाटिल,राजमल पवार, डॉ.देशमुख, मेघराज राठोड,विजू काळे,समाधान तायडे, दिलीप देसाई,रमेश गव्हाडे समाधान काळे,उत्तम गवळे, विष्णू वाघ,भरत राठोड,अविनाश पाटील,कुणाल राजपूत, रवींद्र राजपूत,सुनील निकम,रमेश वामने,गोकुळ रोकडे,जगू मिसाळ,विशाल चव्हाण,राणीदास चव्हाण,श्रावण राठोड, हिरा राठोड,रमेश राठोड, स्वानंद पाटिल,विनोद राठोड,गणेश खैरे,सुभाष वाडकर,मल्लूसिंग चव्हाण, अमोल मापारी आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलत असतांना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, सोयगाव नगर पंचायत प्रशासन अधिक सक्षम,पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येणार आहे.नगर पंचायत प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या विविध विकास कामांना लवकरच मंजुरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सोयगाव शहराच्या विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधांवर विशेष भर दिला जाईल. शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यात येईल. कचरा व्यवस्थापनासाठी नवीन यंत्रसामग्री खरेदी, एलईडी दिव्यांद्वारे वीज बचत, जलसंधारण उपक्रम आणि पर्यावरणपूरक प्रकल्प राबविण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### सपना ठाकूर यांनी भूमिकेसाठी बनारसी बोलीभाषा अवगत केली

**छत्रपती संभाजीनगर :** घरवाली पेडवाली या एण्ड टीव्ही वरील अलौकिक विनोदी मालिकेत रीटा पांडेची भूमिका साकारणाऱ्या सपना ठाकूर यांनी भूमिकेसाठी बनारसी बोलीभाषा आत्मसात केली आहे. चंदिगडची रहिवासी असलेल्या सपना यांनी वाराणसीच्या सांस्कृतिक पार्श्र्वभूमीशी सुसंगत उच्चार, भाषाशैली व देहबोली विकसित करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. स्थानिक लोकांशी संवाद, व्हिडिओ अभ्यास आणि सातत्यपूर्ण तालीम यामुळे त्यांनी पात्राला वास्तवदर्शी रूप दिले. ही मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता एण्ड टीव्हीवर, तसेच सर्व भाग नएए५ वर उपलब्ध आहेत.

### ब्रिंदा त्रिवेदीचा जबरदस्त रूपांतर

सोनी सब वरील 'पुष्पा इम्पॉसिबल' हा शो आपल्या प्रेरणादायी कथेसाठी आणि सहजपणे जोडल्या जाणाऱ्या पात्रांसाठी प्रेक्षकांचा आवडता ठरला आहे. या शोमध्ये पुष्पा (करुणा पांडे) हिची ताकद आणि भावनिक तसेच कठीण परिस्थितींमध्ये तिचा चिकाटीने लढा दाखवला जातो. पुष्पाची हुशार आणि मजबूत प्रतिस्पर्धी कदंबरी (ब्रिंदा त्रिवेदी) नेहमीच तिच्यापेक्षा एक पाऊल पुढे राहण्यासाठी नवे मार्ग शोधत असते. अलीकडेच कदंबरीला पुरुष वेशात पाहिले गेले, जेव्हा तितली (भूमी रामोला) च्या कस्टडीच्या लढाईने नवा टप्पा गाठला. या नव्या लूकने कथानकात अनपेक्षित वळण आणले आणि प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली.

### १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन करणार

**मुंबई :** महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या कॉर्पोरेट-केंद्रित जलसंधारण उपक्रमाला अधिक बळ देत टाटा मोटर्सने मृदा व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केली आहे. या सामंजस्य करारांतर्गत २५ जिल्ह्यांमधील दुष्काळग्रस्त भागांमध्ये १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन करण्यात येणार आहे. हे विस्तारीकरण सहयोग-केंद्रित जल संवर्धन उपक्रमावर आधारित आहे. या उपक्रमाने आधीच वर्ष २०२५ मधील उन्हाळ्यापासून १,४५० हून अधिक जलसाठ्यांचे संवर्धन केले आहे, ज्यामुळे ३,००० कोटी लिटरहून अधिक जल साठवण क्षमता निर्माण झाली आहे आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागांमधील जवळपास ७ लाख व्यक्तींना या क्षमतेचा लाभ झाला आहे.

### गोबोल्टतर्फे मस्टँगसोबतच्या भागीदारीचा विस्तार

**मुंबई :** भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या वेअरेबल तसेच ऑडिओ ब्रँड्सपैकी एक असलेल्या गोबोल्टने दीर्घ कालावधीसाठी आपली विकास रणनीती जाहीर केली आहे. या रणनीतीत कंपनीने प्रामुख्याने आपल्या उत्पादनांचा दर्जा उंचावणे (प्रीमियमायझेशन), नफ्यात वाढ करणे आणि ग्राहकांच्या मनात ब्रँडचे अढळ स्थान तयार करण्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. आर्थिक वर्ष २५ मध्ये सुमारे ८०० कोटी रुपयांचा महसूलाचा टप्पा गाठल्यानंतर कंपनीने आता आर्थिक वर्ष २०२७-२८ पर्यंत महसुलाचा आकडा तीन हजार कोटी रुपयांवर नेण्याचे उद्दीष्ट आखले आहे आणि या उद्दीष्टपुर्तीच्या दिशेने कंपनीने आपली वाटचालही सुरु केली आहे.

### हॅलो कॅशबॅक क्रेडिट कार्ड लाँन्च

**पुणे :** आयडीएफसी फर्स्ट बँकेने हॅलो कॅशबॅक क्रेडिट कार्ड लाँच केले आहे, हे एक फिक्स्ड-डिपॉझिट-बॅक्ड ऑफर असून डिजिटली जाणकार ग्राहकांना, विशेषतः १८+ वयोगटातील तरुणांना ऑनलाइन-फर्स्ट आणि यूपीआय-नेतृत्वाखालील खर्च करण्याच्या सवयी असलेल्यांसाठी क्रेडिट अधिक सुलभ करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हे कार्ड ग्राहकांना दररोजच्या डिजिटल पेमेंटवर मजबूत आणि स्पष्टपणे वेगळे कॅशबॅक प्रस्तावाचा फायदा घेत त्यांचा क्रेडिट इतिहास तयार करण्यास मजबूत बनवते.हॅलो कॅशबॅकमध्ये एक शक्तिशाली टायर्ड कॅशबॅक स्ट्रक्चर आहे, जे १०,००० पेक्षा जास्त ऑनलाइन खर्चावर ५% कॅशबॅक, १०,००० पर्यंत ऑनलाइन खर्चावर ३% कॅशबॅक आणि इन-स्टोअर, कॉन्टॅक्टलेस आणि यूपीआय व्यवहारांवर १% कॅशबॅक देते.

### स्मार्टर ई इंडिया २०२६ बनला गुजरातचा 'ऊर्जेचा महाकुंभ'

**पुणे :** भारताची स्वच्छ ऊर्जा यात्रा आता केवळ लक्ष्यांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती अंमलबजावणीच्या नव्या टप्प्यात प्रवेशली आहे. अशा वेळी तंत्रज्ञान, उत्पादन आणि धोरणांशी संबंधित संवाद एकाच व्यासपीठावर आणणाऱ्या प्लॅटफॉर्मचे महत्त्व वेगाने वाढत आहे. या पार्श्र्वभूमीवर गुजरात - उदयोन्मुख ऊर्जा केंद्र म्हणून - पुन्हा एकदा २५ ते २७ फेब्रुवारीदरम्यान गांधीनगर येथे द स्मार्टर ई चे आयोजन करत आहे. हा कार्यक्रम गुजरातमधील सर्वात मोठ्या स्वच्छ ऊर्जा प्रदर्शनाच्या रूपात स्थापित होत असून उद्योगजगत त्याला 'ऊर्जेचा महाकुंभ' असे संबोधत आहे.

## माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्या पत्नी नफिसा बेगम यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. १६ फेब्रुवारी :** राज्याचे माजी मंत्री आणि सिल्लोड चे विद्यमान आमदार अब्दुल सत्तार यांच्या पत्नी माजी नगराध्यक्षा नफिसा बेगम (वय ६०) यांचे दुःखद निधन झाले. त्या विद्यमान नगराध्यक्ष अब्दुल समीर व जि. प. सदस्य अब्दुल आमेर यांच्या आई होत.



अनेक वर्षांपासून सिल्लोडच्या राजकारणात आणि समाजकारणात सक्रिय असलेल्या व तब्बल पाच वेळा नगराध्यक्ष पद भूषविलेल्या नफिसा बेगम गेल्या काही दिवसापासून आजारी होत्या.त्यांच्या निधनाने सत्तार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, सिल्लोड शहरात शोककळा पसरली आहे.

पहिल्या महिला नगराध्यक्ष राहिलेल्या नफिसा बेगम यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी १० वाजता सिल्लोड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी, त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी त्यांच्या सिल्लोड येथील निवासस्थानी ठेवण्यात आले होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला असून, अंत्यसंस्कारासाठी राज्यातील अनेक मोठे नेते सिल्लोडमध्ये उपस्थित होते.

अब्दुल सत्तार हे सध्याच्या राजकीय समीकरणात महत्त्वपूर्ण नेते मानले जातात. एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी मंत्रिपद भूषवले होते, या राजकीय चढउताराच्या काळात कुटुंबाचा भक्कम आधार असलेल्या नफिसा बेगम यांच्या जाण्याने सत्तार कुटुंबात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

नफिसा बेगम यांनी केवळ एका बड्या राजकीय नेत्याची पत्नी म्हणून काम न करता सिल्लोड नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद भूषवताना त्यांनी शहराच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली.सप्टेंबर २००१ ते सप्टेंबर २०१६ असे तब्बल १६ वर्षे त्या सिल्लोड च्या नगराध्यक्ष म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या पश्र्चात पती आमदार अब्दुल सत्तार नगराध्यक्ष अब्दुल समीर,जि. प. सदस्य अब्दुल आमेर ही दोन मुले, पाच मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. नफिसा बेगम यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक सदस्यांनी फोन द्वारे अब्दुल सत्तार यांचे सांत्वन केले.

अंत्यसंस्कार प्रसंगी खासदार डॉ कल्याणराव काळे, आमदार अर्जुनराव खोतकर, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी आमदार चंद्रकांत दानवे, नितीन पाटील, वैजापूर चे नगराध्यक्ष दिनेशसिंग परदेशी,बाळासाहेब संचेती यांच्यासह सिल्लोड तालुक्यातील तसेच छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'कलम का बादशाह' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. १६ फेब्रुवारी :** व्ही. एम. भैलुमे निर्मित आणि आनंदकुमार सरवदे दिग्दर्शित 'कलम का बादशाह' हा नवा मराठी चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून कायदा, संविधान आणि अन्यायाविरोधातील संघर्ष यांचा प्रभावी संगम प्रेक्षकांसमोर मांडणार आहे. सामाजिक आशयावर आधारित हा सिनेमा सत्तेला प्रश्र्न विचारत सामान्यांच्या हक्कांसाठी उभ्या राहणाऱ्या तरुणांची कथा उलगडतो. चित्रपटात मोनालिसा बागल हिचा दमदार कमबॅक पाहायला मिळणार असून यश डिंबळे, आनंद शिंदे आणि जय मोर्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत. आर. बी. फिल्म्स प्रॉडक्शनच्या बॅनरखाली साकारलेल्या या चित्रपटाचे छायाचित्रण मनीष वि. सोनी यांनी केले आहे, तर पटकथा व संवाद कल्पेश जगताप यांचे आहेत. हिंदी व मराठी अशा द्विभाषिक स्वरूपात प्रदर्शित होणारा हा सिनेमा आशयघन आणि विचारप्रवर्तक ठरण्याची अपेक्षा आहे.

## मिरगी आजाराबाबत जनजागृती करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर , दि. १६ फेब्रुवारी :** मिरगी हा मेंदूशी संबंधित एक दीर्घकालीन आजार असून, जगभरात कोट्यवधी लोक या आजाराने प्रभावित आहेत. (Epilepsy) म्हणजे मेंदूमधील असामान्य विद्युत प्रवाहामुळे वारंवार झटके येण्याची स्थिती होय. योग्य उपचार आणि औषधोपचारांनी मिरगी पूर्णपणे नियंत्रणात ठेवता येऊ शकते असे डॉ आनंद डंक यांनी सांगितले.



मिरगी म्हणजे काय? मिरगी हा संसर्गजन्य आजार नाही. मेंदूतील पेशींमध्ये अचानक आणि अनियंत्रित विद्युत क्रिया वाढल्यामुळे रुग्णाला झटके येतात. झटके काही सेकंदांपासून काही मिनिटांपर्यंत राहू शकतात.

मिरगीचे प्रमुख लक्षणे: अचानक शुद्ध हरपणे, हात-पायांना आकडी येणे, डोळे वर फिरणे,तोंडातून फेस येणे, काही वेळ गोंधळलेली अवस्था, डोक्याला झालेली दुखापत, जन्मजात मेंदू विकार, मेंदूतील संसर्ग, मेंदूतील गाठ (ट्यूमर) काही वेळा कारण अस्पष्ट असते, वरील सर्व कारणामुळे हा आजार होऊ शकतो. मिरगीवर प्रभावी औषधे उपलब्ध आहेत. नियमित आणि वेळेवर औषधे घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे बंद करू नयेत. काही रुग्णांमध्ये शस्त्रक्रिया किंवा विशेष उपचार पद्धतींचा विचार केला जातो. झटका आल्यास काय करावे? रुग्णाला सुरक्षित जागी झोपवावे, डोक्याखाली मऊ वस्तू ठेवावी, घट्ट कपडे सैल करावेत तोंडात कोणतीही वस्तू घालू नये, झटका ५ मिनिटांपेक्षा जास्त काळ चालल्यास त्वरित रुग्णालयात न्यावे.

मिरगी हा भीतीदायक किंवा न बरा होणारा आजार नाही. योग्य उपचारने रुग्ण सामान्य आयुष्य जगू शकतो. मिरगीबद्दलचे गैरसमज दूर करून जागरूकता वाढवणे ही काळाची गरज आहे असे डॉ आनंद डंक, डॉ मिलिंद दुनाखे,डॉ श्रीकांत देशमुख, डॉ जयपाल घुणवत यांनी मत व्यक्त केले. ह्या आजाराविषयी सर्व अद्यावत उपचार मेडिकोवर हॉस्पिटल येथे उपलब्ध आहेत. असे आवाहन सेंटर हेड डॉ विशाल कुटे यांनी केले.

# स्वयंफुर्तीने अतिक्रमण काढण्याची लगबग





**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १६ फेब्रुवारी :** पैठण नगर परिषदेच्या वतीने दोन दिवस मुदत दिलेली अतिक्रमण मोहीम अधिक तीव्र होऊन व्यापाऱ्यांना आपापले अतिक्रमण काढण्याची सूचना देताच पैठणच्या बाजारपेठेत रविवारी रात्री पासून ते सोमवारी दिवसभर व्यापारी बांधवांनी स्वयंफुर्तीने अतिक्रमण काढण्यास लगबग सुरु केली आहे.

नाथषष्टी यात्रेच्या अनुषंगाने पैठण नगर परिषदेच्या वतीने यात्रा परिसरासह शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली असता काळी पिवळी पॉईंट जवळ पोलीस पथक आणि व्यापारी यांच्यात वाद होऊन अतिक्रमण मोहीम दोन दिवसांसाठी संथ करण्यात आली होती. त्यावरून रविवारी रात्री व सोमवारी सकाळ पासूनच अतिक्रमण काढून घ्यावे असा भोंगा शहरात फिरवण्यात आल्याने नाथ हायस्कुल समोरील गाळे, भाजी मार्केट परिसर, मेन रोड परिसर तसेच बसस्थानक परिसरातील तसेच जुना नगर रोडचे व्यापारी स्वतःहून अतिक्रमण काढून घेत आहे.तसेच पोटे मामा चहा दुकानासमोरून खळवाडी कडे जाणारा रस्ता, माँ जिजाजू चौक ते एस.बी.आय भाजी मार्केट रस्ता,तहसील रोड, जुना नगर रोड रस्ता, कोर्ट रोड व बी.अँड सी रस्तावर अतिक्रमण जसेच तसे दिसत आहे.अतिक्रमण काढल्या ठिकाणी न. प. तात्काळ रोड अथवा पीव्हरब्लॉक बसवावे अशी मागणी करण्यात येत आहे.सोमवारी दुपारी मुख्याधिकारी डॉ पल्लवी अंभोरे यांच्यासह व्यापारी शिष्टमंडळाने शहरांत भेटी दिली असता स्वयंफुर्तीने काढण्यात येणाऱ्या अतिक्रमणासाठी आणखीन वेळ देण्यात आली आहे.

जा.क्र.जे-३/ 829 /२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
दिनांक :- 13 FEB 2026

**NOTICE OF INQUIRY - (FORM NO.२)**
**(नमुना क्रमांक - २)**
**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.**

### चौकशी जाहिर नोटीस

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन १९५० याचे कलम १९/२२/२८)
सन २०२५ चा अर्ज क्रमांक ६७/२०२५ कलम - ४१A

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था: श्री. संत गिताबाई सरोदे मठ, समस्त चर्मकार बंधु पंचमंडळ, हराळे समाज, श्रीक्षेत्र वेरुळ, ता. खुलताबाद

नोंदणी क्रमांक ई :- ०५८१ (ओ)

यांस श्री. सुरेश लक्ष्मण गवळे व इतर ०५ यांने कलम ४१६ अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात

१. संतगिताआई सरोदे रा. गिताई मठ, श्रीक्षेत्र वेरुळ, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद. २. श्री. सोनाजी सांडुजी सरोदे, रा. एन-१२, एफ-१४५, स्वामीविवेकानंदनगर, हडको, सिडको, कॉलनी, स.ओ. औरंगाबाद. ३. श्रीमती शांताबाई भागाजी सरोदे, रा. मु.पो. बाबरा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद. ४. श्री. उत्तमराव आसराजी वासने, रा. कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. श्री. नारायण कडुबा सरोदे, रा. फुलंब्री, ता. फुलंब्री जि. औरंगाबाद.

यांस,

ज्या अर्थी मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात कलम ४१६ अन्वये चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी तुम्हास ही नोटीस देण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर तारीख १७/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसुर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे.

आज दिनांक १३/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

स्वाक्षरीत/-
न्यायशाखा (अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

# पैठण पं. स. आवारात पुन्हा गट्टू

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १६ फेब्रुवारी :** तेच तेच ठेकेदारांच्या घशात मलिदा टाकणाऱ्या पंचायत समिती बांधकाम विभागाच्या वतीने आता परिसरात चांगले गट्टू काढून त्याठिकाणी पुन्हा गट्टू बसवण्याचे काम चर्चेत असून जिल्हा परिषद सि.ओ यांना सदरील कामाची तक्रार करून ही याठिकाणी निकृष्ट काम उरकल्या जात असल्याचे बोलले जात आहे.

पंचायत समिती बांधकाम विभागाचे अभियंता यांची सेवानिवृत्ती झाल्यावर विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामाची गती मंदावली होती.याचे मुख्य कारण टेंडर मॅनेज करून त्याच त्याच ठेकेदाराला काम दिल्याने असे होत असल्याचे सांगितले जात आहे. काही दिवसांपासून पं स. आवारात चांगले गट्टू काढून त्याठिकाणी नवीन गट्टू काम करण्यात येत आहे. त्यापाठोपाठ संकुचित जागेत पार्किंग, नको तिथे निधी देऊन निकृष्ट सिमेंट रस्ते बिनधास्त करण्यात येत आहे.विभागामार्फत कारण्यात येणाऱ्या या कामांवर गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड यांनी लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.



### जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क. १०९/२०२६

अर्जदार:- १) मंगल भ्र. मच्छिंद्र लगड वय ५० वर्षे, धंदा घरकाम रा. सावता महाराज मंदिर परिसर, लगड वस्ती, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) यश मच्छिंद्र लगड वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सावता महाराज मंदिर जवळ, लगड बस्ती, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ. कोमल रामेश्र्वर भूमकर वय ३० वर्षे धंदा घरकाम रा गोपाळपूर पो शिरसगाव ता. नेवासा जि. अहिल्यानगर ४) सौ. शितल राहुल जाधव, वय २७ वर्षे धंदा घरकाम रा. टाकळीभान ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर ५) सरुबाई भ्र. गोविंद लगड, वय ७४ वर्षे, धंदा शेती रा. लगड बस्ती,गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

// विरुध्द//

गैर अर्जदार:- निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणं बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ श्री. रविराज बी. दारुंटे यांचे मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र. १ ही त्यांची आई आहे, तसेच अर्जदार क्र.५ ही अर्जदार क्र.१ ची सासु व अर्जदार क्र.२ ते ४ यांची आजी (वडीलांची आई) आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र.५ चा मुलगा नामे मच्छिंद्र गोविंदराव लगड हे लगड वस्ती, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०१/०१/२०२६ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ चे सासरे, अर्जदार क्र. २ ते ४ यांचे आजोबा.अर्जदार क्र.५ चे पति व मयत मच्छिंद्र गोविंदराव लगड यांचे वडील नामे गोविंद शिवराम लगड हे दिनांक १०/११/२०१५ रोजी मयत झालेले आहे. मयत मच्छिंद्र गोविंदराव लगड यांना अर्जदार क्र.१ ते ५ हेचकायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयत मच्छिंद्र गोविंदराव लगड यांना इतर कोणीहीकायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्युपश्र्चात शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या मा. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशःअथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणेवारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १७/०२/२०२६ राजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक २०/०३/२०२६ रोजीची आहे.

कनिष्ठ लिपिक.

आदेशावरून
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर

### जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि.औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क्र.८४०/२०२५

अर्जदार :-१) गोदावरी नारायण मोरे, वय ४२ वर्षे, धंदा, शेती, रा.सारंगपूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद
२) किरण नारायण मोरे, वय २१ वर्षे, धंदा, शेती, रा. सारंगपूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद३) रेणुका नचिकेत मुळे, वय २३ वर्षे, धंदा, घरकाम, रा.मिटमिटा, पडेगांव, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद४) कल्याणी नारायण मोरे, वय १९ वर्षे, धंदा. शिक्षण, रा.सारंगपूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद५) मानसी नारायण मोरे, वय ७ वर्षे, धंदा. शिक्षण, रा.सारंगपूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद, अ.पा. कर्ती आई अर्जदार क्र. १ नामे गोदावरी नारायणमोरे

//विरूध्द//

गैर अर्जदार:- निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस.के.लांडे यांच्या मार्फत यान्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, नारायण विष्णु मोरे हे मौजे सारंगपूर ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. ३०/०६/२०२५ रोजी जिवन अमृत हेमा टो लॉजी सेंटर इंडीया प्रा.लि.औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद या दवाखान्यामध्ये उपचारा दरम्याण मयत झालेले आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे नारायण विष्णु मोरे यांना अर्जदार क्र. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ हा मुलगा आहे तसेच अर्जदार क. ३ ते ५ हया मुली आहे. अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ५ यांची जनक माता आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क.१ ते ५ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप / उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हेजाहीर प्रगटन.

दिनांक १७/०२/२०२६

आदेशावरून
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

### जाहीर प्रगटन/सायटेशन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब,क स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क्र. ४४/२०२६

अर्जदार:-१) मिनाबाई कृष्णा आमराव, वय ४२ वर्षे, धंदा, शेती, रा. भागाठाण, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) कृष्णा विश्वनाथ आमराव, वय ४८ वर्षे, धंदा, शेती, रा. भागाठाण, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

//विरूध्द//

गैर अर्जदार:- निरंक

प्रकरण:-वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, जिगर कृष्णा आमराव हा मौजे भागाठाण ता. गंगापुर येथील रहीवासी होता व तो दि. १५/१०/२०२५ रोजी उपजिल्हा रूग्णालय,शहापूर ठाणे ता. जि. ठाणे येथे उपचारा दरम्याण मयत झालेला आहे.अर्जदार हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे जिगर कृष्णा आमराव यांना अर्जदार क. १ ही आई असून अर्जदार क. २ हे वडील आहे तसेच मयत जिगर कृष्णा आमराव हा अविवाहीत होता. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ व २ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.अर्जदारांना शासकीय निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३०दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप / उजर नोंदवावा.मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक १७/०२/२०२६

आदेशावरून
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा परिषद अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव

विविध कार्यक्रमांचे आयोजन; नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी १७ व १८ फेब्रुवारी अशा दोन दिवशीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम महोत्सवाचे तसेच नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप घोन्सीकर यांनी दिली.

मंगळवारी सकाळी दहा वाजता सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा संकुल, मुख्य मैदान, स्टेडियम परभणी येथे होईल. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर तर विशेष निमंत्रित अतिथी म्हणून महानगरपालिकेचे आयुक्त नितीन नार्वेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे हे असणार आहेत. या महोत्सवात सायंकाळी चार वाजता जिल्हा परिषदेच्या प्रांगणामध्ये नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या समारंभ सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर यांची उपस्थिती असणार आहे.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी सायंकाळी सहा वाजता जिल्हा परिषद मुख्यालयात जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पारितोषिक वितरित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक डॉ. स्मिता पाटील यांची उपस्थिती असणार आहे.

जिल्हा परिषदेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप घोन्सीकर, सर्व विभाग प्रमुख, सर्व गटविकास अधिकारी यांनी केले आहे.

### नूतन महापौर सय्यद इकबाल व उपमहापौर गणेश देशमुख यांनी स्विकारला पदभार

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर सय्यद इकबाल आणि उपमहापौर गणेश देशमुख यांनी आज सोमवार १६ फ ब्रुवारी रोजी आपल्या पदाचा पदभार स्विकारला.

येथील महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या या पदग्रहण सोहळा प्रसंगी महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर, नगरसचिव विकास रत्नपारखे, आमदार डॉ. राहुल पाटील, माजी आमदार सुरेश देखमुख, माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील, काँग्रेसचे शहराध्यक्ष नदीन इनामदार, माजी उपमहापौर भगवान वाघमारे, सय्यद समी उर्फ माजू लाला, शिवसेना उबाठाचे गटनेते ठाकूर, काँग्रेसचे गटनेते गुलमीर खान, सय्यद कादर तसेच शिवसेना उबाठा, काँग्रेससहीत इतर पक्षांचे नवनिर्वाचित सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.डॉ. पाटील म्हणाले, परभणी शहराला एक विकसित शहर बनविण्याचे काम भविष्यकाळात केले जाईल. पुढील ५ वर्षात कधीही न पाहिलेली विकासकामे शहरात करण्यात येतील. राज्यात आम्ही विरोधी पक्षात असलो तरी विकास कामांसाठी सरकारशी भांडून निधी आणूत. सर्वांना सोबत घेऊन आम्हाला महानगरपालीका देशात क्रमांक १ची करुन दाखवायची आहे, असाही विश्वास आ.डॉ. पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

घरफोडी प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात

### ६ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त : सेलू पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी:** सेलू शहरातील सह्याद्रीनगर येथे मागील मंगळवारी (दि. १०) अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करून रोख रक्कम आणि दागिने लंपास केल्याची घटना घडली होती. या घरफोडीतील आरोपींना पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि सेलू पोलिसांनी कारवाई करत ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून या प्रकरणातील तब्बल ६ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

भरदिवसा घडलेल्या या घडफोडी प्रकरणी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हा शाखा आणि सेलू पोलिसांचे पथक तयार करून रवाना करण्यात आले होते. या पथकाने आरोपी रविंद्रसिंग रणजीतसिंग टाक (वय २२, रा.आठवडी बाजार मानवत) यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने इतर दोन साथीदार असल्याची कबुली दिली. तसेच त्याच्याकडून घरफोडी प्रकरणातील सहा लाख दोन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये चार तोळे वजनाच्या दोन पाटल्या, एक तोळा वजनाची अंगठी, पाच ग्रॅम वजनाचे कानातील दागिने, आणि ४० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण सहा लाख दोन हजार रुपयांचा मुद्देमाल आरोपी रविंद्रसिंग रणजित सिंग टाक याच्याकडून हस्तगत केला आहे.

### संत सेवालाल महाराजांचे विचार आजही समाजासाठी मार्गदर्शक : कुलकर्णी :

शारदा महाविद्यालयात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

**परभणी,/प्रतिनिधी :** बंजारा समाजातील थोर मानवतावादी व्यक्तीमत्त्व संत सेवालाल महाराज होत. त्यांनी बंजारा समाजालाच नव्हे तर सर्व मानवजातीला न्याय, समता आणि स्वातंत्र्याचा संदेश दिला. बंजारा समाजाला आत्मनिर्भर बनवून सामाजिक एकजूट या मूलभूत तत्वाकडे नेले, संत सेवालाल महाराजांचे विचार आजही समाजासाठी मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन भारी प्राचार्य बी. जी. कुलकर्णी यांनी केले.

येथील शारदा महाविद्यालयात संत सेवालाल महाराज यांची जयंती राज्यशास्त्र विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी प्राचार्य डॉ. बबन पवार, प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्यातील वडवणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य बी. जी. कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी विचारपीठावर उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे, डॉ. संतोष नाकाडे, डॉ. सुरेश खिस्ते उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. पवार म्हणाले संत सेवालाल महाराज हे अहिंसेची पुजारी होते. बंजारा समाजातील बळी प्रथेला विरोध, दारूबंदी करून स्त्रियांना अधिकार देण्यासाठी आयुष्यभर काम केले. संत सेवालाल महाराज हे त्यागी, दूरदर्शी, बुद्धीप्राधान्य विचाराचे असल्यामुळे ते विज्ञानवादी होते. यावेळी कार्यक्रमाला डॉ. सुनील बल्लाळ, डॉ. नितीन बावळे, डॉ. श्याम पाठक, डॉ. दत्ता चामले, डॉ. हनुमंत शेवाळे, डॉ. प्रशांत मेने, डॉ. सचिन खडके, प्रकाश काळे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रशासक काळातील निर्णय, तोडगा नव्या नगरपरिषदेचा”

# लोकहित जपत तोडगा काढू :- उपनगराध्यक्ष अंकुश लाड

**महेश दिशागत**

**मानवत,/प्रतिनिधी-** मानवत नगरपरिषदेत सध्या सुरू असलेल्या मालमत्ता कर नोटिसांमुळे शहरात निर्माण झालेल्या चर्चेचा उगम प्रशासक कालावधीत घेतलेल्या करनिर्धारण ठरावात असल्याचे स्पष्ट झाले आहे. दि ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात घेण्यात आलेल्या ठरावानुसार प्रशासकीय पातळीवर शहरातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण, बांधकाम प्रकारानुसार वर्गीकरण, झोननिहाय दरनिश्चिती तसेच विविध कर व अधिभार निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. त्या ठरावानुसारच सध्या नागरिकांना नोटिसा देण्यात येत असून त्याची अंमलबजावणी नव्याने निवडून आलेल्या लोकनियुक्त कार्यकारिणीच्या कार्यकाळात होत आहे.





मागील अनेक वर्षे कर निर्धारण नियमित झाले नसल्यामुळे मोठ्या कालावधीनंतर एकाचवेळी कर आकारणीची प्रक्रिया सुरू झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. तथापि हा निर्णय नव्या नगराध्यक्ष किंवा नगरसेवकांनी घेतलेला नसून आधीच मंजूर झालेल्या प्रशासकीय प्रक्रियेचा भाग असल्याचे नगरपरिषदेकडून स्पष्ट करण्यात येत आहे. नगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत हा मालमत्ता कर असून पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, दिवाबत्ती व आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत सेवा देण्यासाठी महसूल आवश्यक असतो. अनेक वर्षे कर आकारणी न झाल्याने आर्थिक ताण निर्माण होत असल्याने कायदेशीर तरतुदीनुसार सर्वेक्षणानंतर दरनिश्चिती करणे बंधनकारक ठरते, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. दरम्यान, नागरिकांच्या तक्रारी व हरकती लक्षात घेऊन नव्या कार्यकारिणीने समन्वयाची भूमिका घेतली आहे. नागरिकांना अचानक आर्थिक भार पडू नये यासाठी प्रत्यक्ष तपासणी, हरकतींची सुनावणी, आणि शक्य त्या प्रमाणात दिलासा देणारा मार्ग शोधण्याबाबत हालचाली सुरू



असल्याची माहिती मिळत आहे. याबाबत उपनगराध्यक्ष अंकुश लाड यांनी सांगितले की, ‘‘नगरपालिकेचा कारभार चालण्यासाठी कर आकारणी आवश्यक आहे, ही वस्तुस्थिती आम्ही नाकारू शकत नाही. मात्र हा निर्णय आमच्या कार्यकाळात घेतलेला नसून प्रशासक कालावधीत पूर्ण झालेल्या प्रक्रियेचा परिणाम आहे. नागरिकांवर अन्याय होणार नाही याची आम्ही पूर्ण काळजी घेऊ. प्रत्येकाची हरकत ऐकून घेऊन कायदेशीर चौकटीत दिलासा देण्याचा प्रयत्न केला जाईल.’’

दरम्यान मुख्याधिकारी कोमल सावरे यांनी स्पष्ट केले की, ‘‘करनिर्धारण प्रक्रिया ही महाराष्ट्र नगरपालिका कायद्यानुसार आवश्यक असून नगरपालिकेच्या आर्थिक स्थैर्यासाठी महसूल उभारणी अपरिहार्य आहे. नोटिसा देणे ही कायदेशीर प्रक्रिया आहे; तथापि नागरिकांनी दिलेल्या हरकतींवरच प्रकरणनिहाय दुरुस्ती व सवलती देता येतात. त्यामुळे जास्तीत जास्त करदात्यांनी लेखी आक्षेप दाखल करणे आवश्यक आहे. सर्व हरकती नियमानुसार ऐकून योग्य त्या सुधारणा करण्यात येतील.’’ सूत्रांच्या माहितीनुसार, नगरपरिषद पातळीवर पुनरावलोकन, तपासणी शिबिरे व नागरिकांशी संवाद वाढवण्यावर भर दिला जात आहे. एकीकडे नगरपालिका चालवण्यासाठी महसूल आवश्यक असल्याची वस्तुस्थिती तर दुसरीकडे नागरिकांचा आर्थिक भार कमी ठेवण्याची लोकप्रतिनिधींची भूमिका या दोन्हींचा समतोल राखण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. यामुळे पुढील काही दिवसांत नागरिकांना दिलासा देणारा समन्वयात्मक निर्णय जाहीर होण्याची शक्यता व्यक्त होत असून नागरिकांनी संयम बाळगून प्रशासन व नगरपरिषदेला सहकार्य करावे, तसेच आपल्या नोटीसबाबत हरकत नोंदवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

कर नोटीस मिळाल्यावर काय करावे?

✻ नोटीस काळजीपूर्वक वाचा व मालमत्तेची माहिती तपासा
✻ क्षेत्रफळ, वापर प्रकार, बांधकाम वर्ष चुकीचे असल्यास हरकत नोंदवा
✻ आवश्यक कागदपत्रे (७/१२, खरेदीखत, नकाशा, जुनी पावती) सोबत द्या
✻ निर्धारित कालावधीत लेखी आक्षेप नगरपरिषदेत जमा करा
✻ सुनावणीस उपस्थित राहून तपासणी करून घ्या

लक्षात ठेवा : हरकत दाखल झालेल्या प्रकरणांनाच नियमांनुसार दुरुस्ती व सवलती देता येतात.

### मारोती मंदिर देवस्थान जमिनीवरील ऊस उत्पन्नाबाबत

तहसीलदारांच्या आदेशाला उच्च न्यायालयाची स्थगिती

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील वाघाळा येथील मारोती मंदिर देवस्थानच्या जमिनीवरील ऊस पिकाचे उत्पन्न एका नोंदणी नसलेल्या समितीच्या बँक खात्यात जमा करण्याचे आदेश देणाऱ्या तहसीलदारांच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालय यांच्या औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती दिली आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे याचिकाकर्त्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वाघाळा येथील गट क्रमांक २३१ मधील ११.९७ हेक्टर जमीन किरण नागोराव घुंबरे व इतर शेतकरी २०२१ पासून कसत आहेत. संबंधित शेतकऱ्यांनी सुमारे ३५ लाख रुपयांची गुंतवणूक करून ओसाड जमीन बागायती केल्याचा दावा केला असून, ते नियमितपणे शेतसारा व पाणीपट्टी भरत असल्याचे नमूद केले आहे. दरम्यान, गावातील काही व्यक्तींनी तक्रार केल्यानंतर पाथरी तहसीलदारांनी १२ व १५ जानेवारी २०२६ रोजी आदेश काढून ऊस गाळपाचे पैसे एका नोंदणी नसलेल्या मंदिर समितीच्या बँक खात्यात जमा करण्याचे निर्देश संबंधित साखर कारखान्याला दिले होते. या आदेशाविरोधात शेतकऱ्यांनी बारहाते यांच्या मार्फत केले.



**जिंतूर-समता फाउंडेशन जिल्हा रुग्णालय परभणी व ग्रामीण रुग्णालय जिंतूर यांच्या सहकार्याने निशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन ग्रामीण रुग्णालय येथे करण्यात आले यासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ संजय मस्के व डॉ गजानन साळुंके यांनी रुग्णांची तपासणी केली.**

### पाथरी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरांच्या बाजारात अवैध तितली पत्ता जुगार तेजीत

प्रत्येक आठवड्यात शेकडो शेतकऱ्यांची आर्थिक लुट करणाऱ्या जुगारास अभय तरी कोणाचे?

**पाथरी,/प्रतिनिधी-** पाथरी कृर्षी उत्पन्न बाजार समिती येथील गुरांच्या बाजारात गेल्या काही महिण्या पासुन बंद आसलेला अवैध तीतली पत्ता जुगार परत तेजीत सुरु झाला आहे दाम दुप्पट,तीप्पट च्या अमिशाला आडकवुन शेतकऱ्यांची संबधीत अवैध तीतली पत्ता जुगार चालक शेतकऱ्यांची आर्थीक लुट करत आहेत शेतकऱ्यांची लुबाडनुक करणाऱ्या अवैध तीतली पत्ता जुगारास व चालकास अभय तरी कोनाचे?चर्चेला उधान

सविस्तर वृत्त आसे कि पाथरी शहरातील कृर्षी उत्पन्न बाजार समीती येथे मराठवाड्यात नावाजलेला गुरांचा बाजार प्रतेक रविवारी भरतो. या गुरांच्या बाजारात पर जिल्ह्यातुन शेतकरी व व्यापारी आपले पशु धन खरेदी विक्री साठी येत आसतात याच बाजारा मध्ये शेती संबधी औजारा बरोबरच विविध प्रकार चे रोप उदा.कांदा,मिर्ची,वांगे आदी प्रकारचे रोपे हि विक्रीसाठी येत आसतात पशुधना बरोबरच कबुत्तर,कोंबडी व बदक या सारखे पक्षी हि विक्रीसाठी येत आहेत या मुळे प्रतेक रविवारी कोटी रुपयाची उलाढाल होत आहे. गुरांच्या बाजारातील कोट्यावधी रुपयाची उला ढाल व होनारी गर्दी चा फायदा घेत सेलु व पाथरी येथील अवैध तीतली पत्ता जुगार चालक यांनी एकत्र येत याच बाजारा मध्ये अवैध तीतली पत्ता जुगार सुरु करुन भोळ्या भाबड्या शेतकऱ्यांना दाम दुप्पट,तीप्पट चे प्रलोभन देवुन शेतकऱ्यांची आर्थीक लट करत आहेत हि फसवणुक झाल्याचे लक्षात आले आसता जर या बाबद शेतकऱ्यांनी प्रतीकार केला तर संबधीत जुगार चालक त्या शेतकऱ्यास दमदाटी करुन मारहन केल्याच्या घटना घडल्याचे बोबल्या जात आहे. या आगोदर काही महिण्या पुर्वी हेच तीतली पत्ता चालक शेतकऱ्यांची लुट करत आसल्याची बात्तम्या वृत्तमान पत्रातुन प्रसारीत होताच ततकालीन सभापती अनिल नखाते यांनी पत्र काढुन कार्यवाहीचा आसुड उगारला होता परंतु गेल्या एक दोन महिण्या पासुन परत हा अवैध तीतली पत्ता नामक जुगार सुरु झाला आसुन शेकडो शेतकऱ्यांची अर्थीक लुट करत आहेत . पाथरी कृर्षी उत्पन्न बाजार समीतीतील अवैध तीतली पत्ता जुगारास अश्रय देवुन सौरक्षन देणारा कोन? या बाबद उलटसुलट चर्चेला उधान आले आहे

## जिंतूर परिसरात अवैध रेती वाहतुक उघड

### पाठलाग दरम्यान मिनी हायवा झाला पलटी

**जिंतूर,/प्रतिनिधी :-** जिंतूर परिसरात अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करत असताना महसूल पथकाच्या पाठलागादरम्यान एक मिनी हायवा पलटी झाल्याची घटना सोमवारी रात्री घडली. चालक अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून फरार झाला असून वाहन व रेती जप्त करण्यात आली आहे. मंडळ अधिकारी मोहसीन खान मेहबुब खान पठाण (वय ४१), रा. अग्रवाल कॉलनी, वसमत (जि. हिंगोली) यांनी पोलीस स्टेशन जिंतूर येथे दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, ते गेल्या दोन वर्षांपासून जिंतूर तहसील कार्यालयात कार्यरत आहेत. दि. १६.०२.२०२६ रोजी तहसीलदारांच्या लेखी आदेशान्वये त्यांनी महसूल पथकासह अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गस्त घातली होती. रात्री सुमारे ८.५० वाजता जिंतूर परिसरात एक पांढऱ्या रंगाचा मिनी हायवा (क्रमांक -२२--३००१) संशयास्पदरीत्या जाताना दिसला.

पथकाने वाहनाचा पाठलाग केला असता चालकाने वेग वाढवत क्रिकेट मैदानाकडे वळण घेतले. मात्र वळणावर वाहनावरील ताबा सुटल्याने हायवा रस्त्याच्या कडेला असलेल्या सिमेंटच्या वीज खांबावर धडकून पलटी झाला.

अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पळून गेला. वाहनात अंदाजे तीन ब्रास रेती आढळून आली असून पलटीमुळे रेती रस्त्याच्या कडेला सांडली. क्रेनच्या साहाय्याने वाहन उभे करण्यात आले, मात्र ते सुरू होत नसल्याने परिसरातच उभे ठेवण्यात आले आहे.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये अंदाजे १० लाख रुपये किंमतीचा मिनी हायवा व १० हजार रुपये किंमतीची अंदाजे तीन ब्रास रेती असा समावेश आहे.

चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ४८(७)(८) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस स्टेशन जिंतूर करत आहे. दरम्यान, स्थानिक नागरिकांमध्ये चर्चा आहे की जिंतूर पोलीस स्टेशन हद्दीत रात्रीच्या वेळी अवैध वाळू वाहतुकीचे प्रकार वारंवार घडत असल्याचे दिसून येत आहे. तालुका स्तरावर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कार्यरत असतानाही अशा प्रकारांना आळा बसत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित यंत्रणांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## माय छोटा इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**जिंतूर,/प्रतिनिधी:** शहरातील माय छोटा इंग्लिश स्कूल येथे शनिवारी वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचे सादरीकरण, पाहुण्यांची उपस्थिती आणि पालकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

मान्यवरांची उपस्थिती : कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हाजी अब्दुल माबुद कुरेशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून मोहसीन खान (उपनगराध्यक्ष, जिंतूर), शकील अहमद, विद्यापूर्ती इंग्लिश स्कूलचे डायरेक्टर दिलीप देवकर, भागवत चव्हाण, उस्मान खान पठाण, शेख रहीम भाई आणि इस्तेखार काजी उपस्थित होते.

शिक्षणासाठी शाळेची बांधिलकी : कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत शाळेचे अध्यक्ष अजमत पठाण यांनी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचवण्याचा शाळेचा ध्यास असल्याचे सांगितले. रोजंदारीवर काम करणाऱ्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांनाही इंग्रजी माध्यमात शिक्षण मिळावे यासाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून फीमध्ये सवलत देण्याची घोषणा त्यांनी केली. विशेषतः ईडब्ल्यूएस





प्रमाणपत्र असलेल्या मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांना शुल्कात सवलत देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पालकांनी शिक्षणाला प्राधान्य द्यावे : अध्यक्ष माबुद कुरेशी यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत पालकांनी मुलांसाठी वेळ देऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

पारितोषिक वितरण : मान्यवरांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. बेस्ट पेरेंट्स ऑफ द इयर : जुनैरा शेख यांच्या पालकांना, स्टुडन्ट ऑफ द इयर : अल्फिशा कुरेशी (हबीब कुरेशी) रनिंग स्पर्धा प्रथम : जोहान शहा (नदीम शहा) लिंबू-चमचा स्पर्धा प्रथम : अल्फैज कुरेशी आनंदनगरी स्पर्धा : प्रथम इनाया शेख, द्वितीय शेख अरशान, अरीश पठाण, अनस शेख, आसाम शेख, जरीयान शहा, अली खान, माज खान, जैन खान, शेख जुनैरा, सय्यद दानिश, सय्यद फैजान, अनाबिया पठाण आदी विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले.

विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी स्नेहसंमेलनाला सुरुवात झाली आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे नियोजन : सूत्रसंचालन मसीरा काजी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रनीता मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद आणि पालकांनी मोठा सहभाग नोंदविला. एकंदरीत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबत दर्जेदार शिक्षण देण्याचा शाळेचा संकल्प या स्नेहसंमेलनातून अधोरेखित झाला.

संपादकीय

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

अग्रलेख...

# भारताची ‘एआय’ क्रांती

**१४० कोटी भारतीयांच्या सामूहिक क्षमतेवर उभा राहिलेला भारत ‘कृत्रिम बुद्धिमत्ता’ क्षेत्रात आघाडी घेण्याच्या तयारीत आहे, असा ठाम विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. ‘इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - २०२६’च्या निमित्ताने भारताने जगाला तंत्रज्ञान, संस्कार आणि सर्वसमावेशक विकासाचा नवा संदेश दिला.**

जग आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. औद्योगिक क्रांती, माहिती तंत्रज्ञान क्रांतीनंतर आता ‘एआय क्रांती’ ही मानवजातीसमोरील सर्वात मोठी परिवर्तनशक्ती म्हणून उभी आहे. या पार्श्वभूमीवर भारताने केवळ सहभागी म्हणून नव्हे, तर दिशादर्शक म्हणून पुढे येण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. ‘इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - २०२६’मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४० कोटी भारतीयांच्या सामूहिक बुद्धिमत्तेवर आधारलेले भारताचे ‘एआय’ भविष्य जगासमोर मांडले. ही परिषद निव्वळ तंत्रज्ञानविषयक चर्चेपुरती मर्यादित नाही. विविध देशांतील धोरणकर्ते, तंत्रज्ञ, संशोधक, उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधी आणि स्टार्टअप-जगतातील नवोन्मेषक अशा अनेक स्तरांतील प्रतिनिधी भारतात एकत्र आले. ५०हून अधिक देशांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाल्याची माहिती देण्यात आली. ही उपस्थिती भारतावरील वाढत्या विश्वासाची पावती आहे.

या परिषदेची संकल्पना ‘सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय’ अशी मांडण्यात आली. ‘एआय’ ही काही मोजक्या कंपन्यांच्या हातातील शक्ती न राहता, ती समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, हा भारताचा दृष्टिकोन आहे. पाश्चिमात्य जगात ‘एआय’ प्रामुख्याने नफा, बाजारपेठ आणि तंत्रस्पर्धा या चौकटीत चर्चिला जातो; भारताने त्यात सामाजिक न्याय, समावेशकता आणि भाषिक वैविध्य यांचा धागा जोडला. हेच भारताचे वेगळेपण आहे. मागील ‘एआय इम्पॅक्ट समिट’मध्ये पंतप्रधानांनी एक सूक्ष्म निरीक्षण नोंदवले होते आणि ते म्हणजे ‘एआय’ने निर्माण केलेल्या चित्रांमध्ये बहुतेक वेळा डाव्या हाताने रेखाटन दाखवले जाते. या उदाहरणातून त्यांनी सांगितले की, तंत्रज्ञान हे ज्या डेटावर प्रशिक्षित होते, त्याच्याच छायेत विचार करते. डेटामध्ये विविधता नसेल, तर ‘एआय’ची दृष्टीही एकांगी राहते. या विधानाने भारताचा ‘एआय’कडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन जगासमोर आला. ‘एआय’ म्हणजे केवळ अल्गोरिदम नव्हे; ती संस्कृती, भाषा आणि अनुभवांचे प्रतिबिंब आहे.

भारताची ‘एआय’ क्षेत्रातील कामगिरी गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढली आहे. सुमारे एक हजार, ५०० स्टार्टअप्स भारतात ‘एआय’ क्षेत्रात कार्यरत आहेत. या स्टार्टअप्सचे एकत्रित मूल्य अब्जावधी डॉलर्समध्ये पोहोचले आहे. आरोग्य, कृषी, शिक्षण, वित्त, संरक्षण, शहरी व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत भारतीय स्टार्टअप्स नवोन्मेष घडवत आहेत. ‘एआय मॉडेल्स’च्या विकासात भारतीय संशोधकांची उपस्थिती जागतिक पातळीवर वाढली आहे. सरकारी पातळीवर भारताने स्पष्ट धोरणात्मक चौकट उभारली आहे. ‘इंडिया एआय मिशन’ हे त्याचे केंद्रबिंदू. दहा हजार, ३७२ कोटी रुपयांच्या तरतुदीसह भारत ‘एआय’ निर्मितीसाठी ३८ हजारहून अधिक ‘जीपीयू’च्या संगणकीय क्षमतेचा वापर करीत आहे. ही केवळ आकडेवारी नाही; ती स्वदेशी ‘एआय’ पायाभूत सुविधांची उभारणी आहे. जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांवर पूर्ण अवलंबित्व न ठेवता, स्वतःचे मॉडेल्स, स्वतःचे डेटा सेंटर आणि स्वतःची संशोधनक्षमता उभारण्याचा प्रयत्न आहे.

भाषिक वैविध्याच्या दृष्टीने ‘भाषिणी’ हा उपक्रम विशेष उल्लेखनीय आहे. भारतासारख्या बहुभाषिक देशात ‘एआय’चा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायचा असेल, तर तंत्रज्ञानाला भारतीय भाषांमध्ये बोलता आले पाहिजे. ‘भाषिणी’ प्लॅटफॉर्म विविध भारतीय भाषांमध्ये अनुवाद, संवाद आणि माहितीप्रवेश सुलभ करतो. हेच ‘सर्वजन हिताय’ या संकल्पनेचे मूर्त रूप आहे. ‘भारत जेन’ आणि ‘एलएलएम’ विकासाच्या माध्यमातून भारतीय संदर्भातील मोठी भाषा मॉडेल्स विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. ‘राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२०’ अंतर्गत ‘एआय’ शिक्षणाचा समावेश करून शालेय पातळीवरच तंत्रज्ञानाची बीजे पेरली जात आहेत. नव्या पिढीला ‘एआय’ केवळ वापरकर्ता म्हणून नव्हे, तर निर्माता म्हणून घडवण्याचा प्रयत्न आहे.

‘एआय’चा वापर भारतात अनेक क्षेत्रांत होत आहे. कृषी क्षेत्रात हवामान अंदाज, पीक व्यवस्थापन आणि रोगनियंत्रणासाठी ‘एआय’चा उपयोग. आरोग्य क्षेत्रात निदान प्रक्रिया, टेलिमेडिसिन आणि रोग-नकाशे तयार करण्यासाठी साहाय्य. वित्तीय क्षेत्रात फसवणूक ओळखणे, डिजिटल व्यवहारांचे विश्लेषण. शहरी व्यवस्थापनात वाहतूक नियंत्रण, स्मार्ट सिटी उपक्रम. या सर्वांचा थेट परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. ‘डिजिटल इंडिया’, ‘आधार’, ‘यूपीआय’, ‘जनधन’ यांसारख्या उपक्रमांनी डेटा आणि डिजिटल पायाभूत सुविधा तयार केल्या. त्याच पायावर ‘एआय’ची उभारणी होत आहे. नागरिकांना शासनसेवा अधिक वेगाने आणि पारदर्शक पद्धतीने देण्यासाठी ‘एआय’चा वापर वाढतो आहे. सरकारी कार्यालयांतील प्रक्रिया सुलभ करण्यापासून न्यायव्यवस्थेतील प्रकरणांचे वर्गीकरण करण्यापर्यंत ‘एआय’चा विस्तार होत आहे.

‘परीक्षा पे चर्चा’ या कार्यक्रमात पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना ‘एआय’चा सकारात्मक वापर कसा करावा, याचे उदाहरण दिले. ‘एआय’ ही शॉर्टकट नाही; ती शिकण्याचे साधन आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. माहिती गोळा करण्यासाठी, कल्पना विस्तारण्यासाठी आणि कौशल्यवृद्धीसाठी ‘एआय’चा उपयोग करा; पण विचारशक्ती गमावू नका, हा संदेश नव्या पिढीला देण्यात आला. तंत्रज्ञान आणि मानवी मूल्ये यांचा समतोल साधण्याचा हा प्रयत्न आहे. भारताचे स्वतःचे संशोधनही वाढत आहे. ‘आयआयटी’, ‘आयआयएससी’ आणि इतर संशोधन संस्थांमध्ये ‘एआय’वर मोठ्या प्रमाणात प्रकल्प सुरू आहेत. ‘जागतिक जर्नल्स’मध्ये भारतीय संशोधकांची उपस्थिती वाढली आहे. स्टार्टअप्स आणि अकादमिक क्षेत्र यांच्यातील सहकार्यामुळे नवोन्मेषाला गती मिळत आहे.

‘इंडिया एआय डेटा’ आणि ‘एआय लॅब’ यांसारख्या उपक्रमांमुळे संशोधकांना आवश्यक डेटा आणि संगणकीय सुविधा उपलब्ध होत आहेत. ‘एआय’ क्षेत्रात नैतिकतेचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. डेटा गोपनीयता, अल्गोरिदमिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांबाबत भारताने संतुलित भूमिका घेतली आहे. तंत्रज्ञानाची प्रगती आणि नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण या दोन्हींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न दिसतो. या सर्व प्रक्रियेत भारताची सॉफ्ट पॉवरही ठळकपणे समोर आली. योग, आयुर्वेद, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि लोकशाही मूल्ये यांचा संगम भारताला वेगळेपण देतो. ‘एआय इम्पॅक्ट समिट’मध्ये जगभरातील प्रतिनिधींनी भारताच्या या सर्वसमावेशक दृष्टिकोनाची दखल घेतली. केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर तंत्रज्ञानाचा नैतिक वापर या विषयावर भारत नेतृत्व करू शकतो, असा संदेश गेला.

भारतासाठी या परिषदेचा लाभ बहुआयामी आहे. गुंतवणूक वाढ, संशोधन सहकार्य, स्टार्टअप्सना जागतिक बाजारपेठ आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जागतिक धोरणनिर्मितीत सहभाग. ‘एआय’चे भवितव्य केवळ काही मोजक्या देशांनी ठरवू नये; विकसनशील जगाचाही आवाज असावा, ही भारताची भूमिका आहे. १४० कोटी भारतीय ही लोकसंख्या एक विशाल डेटा, कौशल्य आणि नवोन्मेष शक्ती आहे. या शक्तीला योग्य दिशा मिळाली, तर भारत ‘एआय’ क्षेत्रात केवळ सहभागी नव्हे, तर मार्गदर्शक ठरू शकतो. पंतप्रधानांनी व्यक्त केलेला आत्मविश्वास हा घोषवाक्यापुरता मर्यादित नाही; तो धोरण, पायाभूत सुविधा आणि मानवी संसाधन यांच्या एकत्रित प्रयत्नांवर आधारलेला आहे. ‘एआय’च्या या नव्या युगात प्रश्न हा नाही की, भारत यात सक्रिय सहभागी होणार का? प्रश्न असा आहे की, भारत याचे नेतृत्व किती प्रभावीपणे करणार. ‘इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - २०२६’ने जगाला स्पष्ट संदेश दिला आहे आणि तो म्हणजे भारत तंत्रज्ञानाचा वापर सत्तेसाठी नव्हे, तर सर्वांच्या प्रगतीसाठी करणार आहे आणि या प्रवासात १४० कोटी भारतीय, हीच त्याची सर्वात मोठी ताकद आहे.

# भविष्याच्या सुरक्षेसाठी...

**देशातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या हा देशासमोरचा गंभीर प्रश्न असून, यावर केलेले आजवरचे सर्व उपाय हे मृगजळच ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या हा भविष्य अंधकारमय करण्याचा प्रकार असून, त्याचे गांभीर्य लक्षात घेऊनच सर्वोच्च न्यायालयाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत. या सर्व घटनांचा घेतलेला आढावा...**



शिक्षण

संदीप वाकचौरे

देशातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येबाबत यापूर्व न्यायालयाने अनेकदा चिंता व्यक्त केली आहे. त्याचबरोबर देशातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसंदर्भात, सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षण संस्थांमधील आत्महत्या कमी करण्यासाठी नुकत्याच महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या. त्यासंदर्भाने तत्काळ कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. जगात विद्यार्थ्यांच्या आत्महत्या घडतात, मात्र आपल्या देशातील वयवर्षे १५ ते २९ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या अधिक चिंताजनक आहेत. त्याचवेळी ते प्रमाणही चिंताजनक आहे. एकीकडे आपला देश सर्वाधिक तरुणांचा देश आहे. ज्या देशाचे भविष्य तरुणाईच्या आणि शिक्षणाच्या हाती आहे, त्या देशातील शिकत असलेल्या तरुणांच्या आत्महत्या या देशातील धुरिणांना विचार करायला लावणाऱ्या आहेत. एकीकडे देशात आरोप-प्रत्यारोप होत आहेत. शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्या नेमल्या गेल्या आहेत. समित्यांनी प्रश्नांचा अभ्यास करत शिफारसी केल्या आहेत. अद्याप त्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यात व्यवस्थेला पुरेसे यश आले नाही, हे वास्तव आहे. मात्र, त्याचवेळी या देशातील तरुणाई निराशेच्या छायेत आणि तणावात राहून जीवन संपवत असेल, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वच विचार करण्याची गरज आहे, अन्यथा उद्याचे महासत्तेचे स्वप्न धुळीस मिळेल. शेवटी आत्महत्या या कोणत्याही व्यवस्थेचे अपयश असते. त्यामुळे शिक्षणातून काही पेरायचे राहिले आहेत काय? याचा शोध घेण्याचा प्रयत्न व्हायला हवाच. पण, त्याचवेळी हे विद्याथ आत्महत्या का करत आहेत, याचाही विचार करायला हवा.

राष्ट्रीय कृती दलाच्या सर्वेक्षणानुसार आजाराने जितके मृत्यू होत नाहीत, त्यापेक्षा अधिक मृत्यू हे १५ ते २९ वयोगटातील विद्यार्थ्यांचे आत्महत्येने घडत आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवाल सन २०२२ नुसार सुमारे १३ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. सध्या देशातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण, २८ टक्क्यांच्या आसपास आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार हे प्रमाण २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत न्यायचे आहे. १०० टक्के विद्याथ उच्च शिक्षणात सहभागी करून घेण्यासाठी, अजून बराच काळ जावा लागणार आहे. अर्थात, आपल्याला स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांपर्यत, लोकसंख्येच्या २५ टक्के तरुणाईच सहभागी करून घेता आली आहे. १९९०च्या नंतर जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, उदारीकरणामुळे, खासगीकरणानंतर व्यापारीकरणाचा आलेख अधिक उंचावलेला दिसत आहे. त्याचबरोबर काही प्रमाणात राज्यातील सहकारी संस्थाच्या निर्मितीमुळे, ग्रामीण भागातही शिक्षण संस्था सुरू झाल्या. त्याचा हातभार म्हणजे उच्च शिक्षण संस्थांची संख्या वाढली. अर्थात त्याचा काहीसा परिणाम देशातील वंचित घटकातील विद्याथ, काही प्रमाणात उच्च शिक्षणात सहभागी होत आहेत. संख्यात्मक वाढ एकीकडे समाधान देत असली तरी, ही तरुणाई शिक्षणाने सक्षम होत आहे काय? याचाही शोध घ्यावा लागणार आहे.

सध्या तरी आपल्या उच्च शिक्षणासमोर अनेक मोठी आव्हाने आहेत. उच्च शिक्षणात गुणवत्तेचा एकीकडे प्रश्न आहे आणि त्याचवेळी या टप्प्यावर महाविद्यालयांमधून रॅगिंग, हाणामाऱ्या, गुन्हेगारी, विनयभंग, खून यांसारख्या घटना समोर येत आहेत. नीतिमूल्यांचा प्रश्न डोके वर काढत आहे. वारंवार शिक्षणाची गुणवत्ता, गळती, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि आत्महत्या यांसारख्या प्रश्नांवर, उच्च शिक्षण विभागाच्या प्रशासनाच्यावतीने सातत्याने नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न होत आहेत. मात्र, त्यांच्या प्रयत्नांना किती यश येत आहे, हाही संशोधनाचाच विषय. त्यामुळे नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येला केवळ शैक्षणिक कारणे कारणीभूत आहेत असे नाही, तर त्यामागे सामाजिक, आर्थिक समस्या, मानसिक, भावनिक आरोग्य, स्थानिक परिस्थिती, शिक्षकांचा अभाव यांसारखी अनेक कारणे आहेत. आपल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीवर नजर टाकता विद्यार्थ्यांना भविष्य आशावादी वाटत नसेल, तर निराशेची छाया निश्चित मुलांच्या मनावर परिणाम करते. त्याचा परिणाम म्हणून विद्याथ आत्महत्येचा मार्ग निवडतात.

राष्ट्रीय कृती दलाने विविध कायदे, धोरण, विविध समित्यांच्या शिफारसी, राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवाल, शैक्षणिक संस्थेतील विविध मनुष्यबळ, विद्याथ समूह, पालक, शैक्षणिक संस्था, ऑनलाईन वृत्तपत्रे नमुना नोंदणी सर्वेक्षणांचा अभ्यास केला. त्यानुसार संबंधित संस्थानी योग्य उपाय केल्यास चांगले नियंत्रण होऊ शकते, असे म्हटले आहे. त्यानुसार देशात सध्या उच्च शिक्षण संस्थामधून रॅगिंग प्रतिबंधक, महिलांच्या छळापासूनच्या उपाययोजनांसाठीच्या, विद्याथ कल्याण समित्या आस्तित्वात आहेत. इतके असूनही त्याचा किती परिणाम साधला जातो का, हे पाहणेही गरजेचे आहे. महाविद्यालय प्रशासनाच्या मते, या समित्यांना अत्यंत मर्यादित असे अधिकार आहेत. संस्थांची घडलेल्या घटना लपवण्याची मानसिकता आहे. या घटना समोर आल्यास संस्थांच्या बदनामीची भीती त्यांना असते. एकीकडे वास्तव आणि चिंता असताना उच्च शिक्षण संस्थांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करावे, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाचे न्या. जे. बी. पारडीवाला व न्या. आर. महादेवन यांच्या पीठाने नुकतेच दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षण संस्थांमधून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसंदर्भात, चिंता व्यक्त केली आहे. त्यासंदर्भात काही उपाययोजना करायला हव्यात. उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांबाबत त्वरित पोलिसांना कळवावे, संस्थांची ती नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. या आत्महत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा अभ्यासही महत्त्वाचा आहे. शैक्षणिक संस्थांमधील उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली होती. अहवालानुसार शैक्षणिक संकुलातून विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी व मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न फारसे दखलपात्र नाहीत. उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांच्या आत्महत्येनंतर वैयक्तिक स्वाययत्ता समजून, संस्थात्मक जबाबदारी झटकतात. विद्याथ आत्महत्येची समस्या फक्त मानसिक आरोग्याशीच संबंधित नाही, तर त्याचे सामाजिक, आर्थिक परिणामही आहेत.

न्यायालयाच्या निर्देशानुसार उच्च शिक्षण संस्थांनी , १५ ते २९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या आकडेवारीची नोंदणी करणारी यंत्रणा विकसित करावी. त्यासाठी सार्वजनिक आरोग्य व लोकसंख्याशास्त्रज्ञांची मदत घेण्यात यावी. राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवालात शालेय व उच्च शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी वेगळी नमूद करावी. उच्च शिक्षण संस्थांनी त्यांच्या शैक्षणिक संकुलाशी संबंधित विद्यार्थ्यांच्या अनैसर्गिक मृत्यू व आत्महत्यांबाबत घटनेची माहिती पोलीस अधिकाऱ्यांना कळवण्याची जबाबदारी निश्चित केली आहे. उच्च शिक्षणांसी संबंधित यंत्रणेला अनैसर्गिक मृत्यूबाबत माहिती द्यावी, विद्यार्थ्यांना आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी २४ तास वैद्यकीय सेवा उपलब्ध असावी, संकुलात सुविधा नसेल, तर परिसरात उपलब्ध असावी, सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच महत्त्वाची प्रशासकीय रिक्त पदे चार महिन्यांत भरली जावीत, विविध प्रवर्गांतील पदे प्राधान्याने भरली जावीत, रिक्त होणाऱ्या जागा या एका महिन्याच्या आत भरल्या जाव्यात, रिक्त जागांसंबंधीचा अहवाल केंद्र, राज्य सरकारला पाठवला जावा, विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृत्ती सरकारने चार महिन्यांच्या आत अदा करावी, एखाद्या संस्थेने विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती वितरित केली नाही, तर दोन महिन्यांत संबंधिताना नोटीस देऊन कारणे जाणून घ्यावीत, परीक्षाशुल्क न मिळाल्यास संबधित विद्यार्थ्यांना वर्गातील उपस्थितीसाठी प्रतिबंध करता येणार नाही, तसेच परीक्षेला बसू देण्यापासून परावृत्त करता येणार नाही, उच्च शिक्षण संस्थामध्ये कार्यरत असलेल्या विविध समित्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात काटेकोरपणे पालन करावे, असेही नमूद केले आहे.

उच्च शिक्षण संस्थामध्ये होणाऱ्या आत्महत्येचा आलेख कमी होण्यासाठी या उपाययोजना निश्चित हातभार लावू शकतील, यात शंका नाही. मात्र, अनेकदा केवळ आर्थिक परिस्थिती नाही, म्हणून विद्याथ उच्च शिक्षणापासून दुरावतात. समाजातील विषमतेचे चटके या विद्यार्थ्यांच्या मनाला तीव्र स्वरूपात बसतात. त्यामुळे आत्मविश्वास कमी होणे, निराशा येणे, न्यूनगंडाची भावना निर्माण होणे घडते. उच्च शिक्षण मोठ्या प्रमाणावर खासगी क्षेत्राच्या हाती गेले आहे. खासगीकरणामुळे शिक्षण महाग होत असून, वाढत्या महागाईचा विचार करता, शिक्षण परवडणारे राहिलेले नाही. त्यामुळे आपण आपल्या मातापित्याचे स्वप्न पूर्ण करू शकणार नाही, ही मनातील भावना मुलांना निराशेच्या खाईत लोटत आहे. त्याचाही परिणाम मुलांच्या मानसिक विकासाच्या प्रक्रियेवर होताना दिसत आहे. त्यातून मुले आत्महत्येचा मार्ग जसे चालतात, त्याप्रमाणे गळतीचा पर्यायदेखील समोर येतो. एकीकडे आपल्याला २०३५ पर्यंत ५० टक्क्यांच्या आसपास नोंदणी करण्याचे आव्हान आहे आणि त्याचवेळी शिक्षण महाग होत आहे. विद्याथ आत्महत्या करत आहेत, ही सारी परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. आपण या प्रश्नांकडे आज गंभीरपणे पाहिले नाही, तर उद्याचे भविष्य अधिक अंधारलेले असेल, यात शंका नाही. तरुणाई आत्महत्येच्या दिशेने जाणार असेल, आपल्याला महासत्तेच्या दिशेने प्रवास करणे कठीण आहे.

# हिमरांगातील क्रीडापर्व

गुलमर्गच्या हिमाच्छादित डोंगररांगांमध्ये २३ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारीदरम्यान रंगणाऱ्या ‘खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धा’, क्रीडाआधारित अर्थव्यवस्थेच्या व्यापक चित्राचा भाग आहेत. या स्पर्धा गुलमर्गमध्ये होत असल्याने, स्थानिक पर्यटनाला चालना मिळण्याचा अंदाज तज्ज्ञांकडून वर्तवला जात आहे. केंद्र सरकारने क्रीडाक्षेत्राचा विकास केंद्रस्थानी ठेवण्याचा जो निर्णय घेतला, त्याचे ठोस परिणाम आता दिसू लागले आहेत.

‘कलम ३७०’ रद्द झाल्यानंतर काश्मीरमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासाला वेग आला. रस्ते, बोगदे, रेल्वे संपर्क, पर्यटन सुविधा आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी केंद्राने सातत्यपूर्ण प्रयत्न केले. त्याच धतवर क्रीडाक्षेत्रालाही प्राधान्य देण्यात आले. देशपातळीवरही केंद्र सरकारच्या प्रयत्नांतून होत असलेला, क्रीडाक्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विस्तार हा अभूतपूर्व असाच. विविध राज्यांत आधुनिक स्टेडियम, बहुउद्देशीय क्रीडासंकुले, प्रशिक्षण अकादमी आणि ‘टार्गेट ऑलिम्पिक पोडियम’सारख्या योजनांमुळे, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळू लागले आहे. परिणामी, भारतीय खेळाडू जागतिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करताना दिसत आहेत. ही यशस्वी कामगिरी अचूक नियोजन आणि पायाभूत गुंतवणुकीचाच परिणाम आहे.

‘खेलो इंडिया’मुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील क्रीडाप्रतिभेला राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध झाले. यातूनच पूव झाकोळलेली गुणवत्ता आता प्रकाशझोतातही आली. क्रीडा-अर्थव्यवस्थेचा परिणाम स्थानिक उद्योगांवरही होतो. स्टेडियम उभारणी, क्रीडासाहित्य निर्मिती, प्रशिक्षण सुविधा, पर्यटन, प्रसारण आणि विपणन या सर्वच क्षेत्रांत रोजगारनिर्मिती होते. काश्मीरसारख्या प्रदेशात तर क्रीडा आणि पर्यटनाचा संगम आर्थिक स्थैर्याला नवे परिमाण देतो. देशविदेशांतून येणारे पर्यटक, अशा स्पर्धांमुळे वाढणारी प्रसिद्धी आणि स्थानिक उत्पादनांना मिळणाऱ्या बाजारपेठेमुळे काश्मीरची अर्थव्यवस्था अधिक सक्षम होण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकार क्रीडाक्षेत्राला केवळ स्पर्धात्मक क्षेत्र न मानता, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले जात आहे. या क्षेत्रासाठीचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणीमधील सातत्यामुळे, लवकरच क्रीडा-अर्थव्यवस्थेचे हे नवे पर्व देशाच्या सर्वांगीण विकासाला भक्कम आधार देईल.

वेध

कौस्तुभ वीरकर

# वाहनविक्रीची भरारी

भारतातील वाहनविक्रीत झालेली अलीकडील वाढ, अर्थव्यवस्थेच्या अंतर्प्रवाहातील बदलांचे द्योतक आहे. जानेवारी महिन्यात प्रवासी वाहनांच्या विक्रीत १३ टक्के, दुचाकी वाहनांत २६ टक्के आणि तीनचाकी वाहनांत ३० टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. गेल्या वषच्या ५८ हजारम् १६७ युनिट्सची झालेली विक्री, यंदा ७५ हजार, ७२५ युनिट्सपर्यंत पोहोचली. ही आकडेवारी ग्राहकांमधील आत्मविश्वास, बाजारातील चलनवाढीवरील नियंत्रण आणि धोरणात्मक हस्तक्षेपांचे परिणाम यांचे द्योतक ठरते. या वाढीमागील पहिला घटक म्हणजे आर्थिक स्थैर्याची जाणीव. गेल्या काही तिमाहींमध्ये महागाईचा दर तुलनेने नियंत्रित राहिल्याने आणि व्याजदरांतील स्थैर्यामुळे, ग्राहकांनी दीर्घकालीन खरेदीचे निर्णय पुढे ढकलण्याऐवजी अमलात आणले. वाहनखरेदी ही भावनिक नसून आर्थिक निर्णय असतो; तो उत्पन्नावरील विश्वास आणि भविष्यातील स्थैर्याच्या अपेक्षांवर आधारलेला असतो. त्यामुळे प्रवासी वाहनविक्रीतील वाढ ही मध्यमवगय आशावादाची खूण आहे.

दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे सरकारी धोरणांचे परिणाम. वाहनांवरील जीएसटी कमी केल्याने, अंतिम ग्राहकांवरील किमतीचा ताण कमी झाला. विशेषतः दुचाकी व लहान प्रवासी वाहनांच्या श्रेणीत या करसवलतींचा अप्रत्यक्ष परिणाम दिसून आला. शिवाय, पायाभूत सुविधांवरील सार्वजनिक गुंतवणुकीमुळेही वाहनांची गरज आणि उपयुक्तताही वाढली. वाहन हे केवळ चैनीचे साधन न राहता, दैनंदिन व्यवहाराचे आवश्यक साधन बनले. दुचाकी विक्रीतील २६ टक्क्यांची वाढ ग्रामीण आणि निमशहरी अर्थव्यवस्थेतील खरेदीक्षमता दर्शवते. कृषी उत्पन्नातील सुधारणा, ग्रामीण रोजगार हमी योजनांचा प्रभाव, तसेच सूक्ष्म वित्तपुरवठ्याची उपलब्धतेमुळे ग्रामीण ग्राहक बाजारात सक्रिय झाले.

तीनचाकी विक्रीतील झेपही सेवाक्षेत्रातील हालचालींचे द्योतक म्हणावे लागेल. ई-कॉमर्स वितरण, लघुव्यवसाय, प्रवासी वाहतूक या क्षेत्रांत वाढलेली मागणी यामागे आहे. वाहन उद्योग हा बहुआयामी परिसंस्थेचा केंद्रबिंदू असल्याने, त्यातील वाढीचा प्रतिध्वनी पोलाद, रबर, इलेक्ट्रॉनिक्स, लॉजिस्टिक्स, विमा, बँकिंग अशा अनेक क्षेत्रांत उमटतो. उत्पादनवाढ म्हणजे रोजगारवाढ; रोजगारवाढ म्हणजे क्रयशक्तीवाढ असा सकारात्मक चक्राकार परिणाम यातून दिसतो. एकंदरीत, वाहनविक्रीतील वाढ ही भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची खूण आहे.

# तापलेला हिवाळा

समाजाच्या जीवनव्यवहारातून तंटे, वितंडवाद आपण समूळ नष्ट करु शकत नाही. किंबहुना, तसे केल्यास स्वर्गलोकीचचे नंदनवन आपण इथेच अनुभवू. परंतु, माणसांचे वेगवेगळे समूह, त्यांच्या धारणा यांमधूनच सातत्याने मानवजातीत विविध संघर्ष जन्माला येतात. काळाच्या ओघात माणसाची भांडण करण्याची क्षमता नुसती वाढलीच नाही, तर बदललीसुद्धा! दगड-धोंड्यापासून, पृथ्वीचा सर्वनाश करण्याऱ्या अणुबॉम्बपर्यंत माणसाने चमत्कारिक प्रगती केली. असे असले तरी, काळाच्या ओघात या संघर्षातून मुक्ती मिळवण्यासाठी समन्वय झाला पाहिजे, असा विचारही अनेकांनी केला. सातासमुद्रापार जाणारी एखादी कला, किमान दोन राष्ट्रांना जोडते. अशाच पद्धतीने जेव्हा आंतरराष्ट्रीय क्रीडा महोत्सवांचे आयोजन होते, तेव्हा खेळाप्रति असलेल्या निष्ठेतून एका प्रकारचा सकारात्मक संघर्ष आपल्याला अनुभवायला मिळतो. अशा क्रीडा महोत्सवांच्या संगमातील केंद्रबिंदू म्हणजे ऑलिम्पिक्स. सध्या ईशान्य इटलीमध्ये २०२६ हिवाळी ऑलिम्पिकचे आयोजन करण्यात आले आहे. ‘मिलानो कोर्तिना २०२६’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या स्पर्धेत, ६ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारीदरम्यान इटलीच्या अनेक भागांमध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, काही वादग्रस्त घटनांमुळे या क्रीडा महोत्सवाला वेगळेच वळण लागले आहे.



जगाच्या पाठीवर

मुकुल आव्हाड

स्केलेटन रेसिंग या स्पर्धेमध्ये मागच्या काही दिवसांमध्ये घडलेल्या एका विवादास्पद घटनेने, साऱ्यांचेच लक्ष्य वेधून घेतले. युक्रेनचा स्केलेटन रेसर व्लादिस्लाव हेरास्केविच याने त्याच्या हेलमेटवर, रशिया-युक्रेन युद्धात मृत्युमुखी पडलेल्या २४ युक्रेनियन खेळाडू आणि मुलांचे स्मृतिप्रीत्यार्थ फोटो लावले होते. ‘आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती’ने याला ‘राजकीय’ मानून, ‘ऑलिम्पिक चार्टर’च्या कलमानुसार खेळाडूवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. त्याला हेलमेट बदलण्यास सांगण्यात आले होते, पण त्याने नकार दिल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली. आपल्या राजकीय मतांचे प्रदर्शन केल्यामुळे, या कारवाईला खेळाडूला सामोरं जावं लागलं. युक्रेनचे राष्ट्रपती व्होल्दोमीर झेलेन्सकी यांनी अर्थातच यावर नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले की, ‘‘ऑलिम्पिकसारख्या संस्थांनी आक्रमणकर्त्यांच्या कारस्थनाला बळी न पडता, युद्ध थांबवण्याच्या दिशेने प्रयत्न करायला हवे.’’

बब्सले, स्केलेटन आणि लुज यांसारख्या खेळांसाठी स्लायडिंग ट्रॅक बांधावा लागतो. हा ट्रॅक बांधण्यासाठी सुमारे ११८ दशलक्ष युरो (जवळपास १ हजार, १०० कोटी रुपये) खर्च करण्यात आला. इतक्या मोठ्या प्रमाणात ज्या ठिकाणी खर्च होतो, तिथे अर्थातच काही समाजघटकांना हा पैशाचा अपव्यय वाटू शकतो, त्याअनुषंगानेही याचा विरोध करण्यात आला. सोबतच, ट्रॅकसाठी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वृक्षांच्या कत्तलीमुळेही इटली सरकारने चांगलाच रोष ओढावून घेतला आहे. स्की-जम्पिंग या खेळामध्ये विजयी होण्यासाठी, काही खेळाडू सूटच्या मापनात फेरफार करण्यासाठी आणि थोडे मोठे, अधिक वायुगतिकीय सूट मिळवण्यासाठी त्यांच्या जननेंद्रियांमध्ये पॅराफिन किंवा तत्सम इंजेक्शन घेत असल्याचा आरोप करण्यात आला. जर्मनीमध्ये पहिल्यांदाच प्रसिद्ध झालेल्या या अफवांमुळे ‘वर्ल्ड ॲण्टी डोपिंग एजन्सी’ आणि अनेक संस्था खडबडून जाग्या झाल्या आहेत.

अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स आणि त्यांच्या पत्नी उषा यांना ऑलिम्पिकच्या उद्घाटन समारंभाच्यावेळी, लोकांनी ‘बू’ करून दाम्पत्याचा निषेध नोंदवला. या सगळ्या घटनांमध्ये अगदी हास्यास्पद ठरावी अशी कुठली घटना असेल, तर ती म्हणजे पदकांचं खराब होणं. स्पर्धेच्या पहिल्याच आठवड्यात अनेक दिग्गज खेळाडूंनी त्यांची पदके खराब झाल्याचे समाजमाध्यमांवर दाखवले. अमेरिकेच्या ब्रीझी जॉन्सन यांनी महिलांच्या ’डाऊनहिल स्कीईंग’मध्ये सुवर्णपदक जिंकल्यानंतर, ब्रीझी आनंदाने उड्या मारत असताना तिचे पदक रिबनमधून निखळून खाली पडले. तिने पत्रकारांना तिचे तुटलेले आणि चिरा पडलेले सुवर्णपदक दाखवले. स्वीडनच्या एबा ॲण्डरसन हिचे रौप्यपदक बर्फात पडले आणि त्याचे दोन तुकडे झाले. आता ऑलिम्पिकसारख्या स्पर्धेतसुद्धा अशा गोष्टी घडाव्या, यातून स्थानिक प्रश्नांचे जागतिक महत्त्व लक्षात येते. एकूणच काय, तर वितंडवादाच्या भोवऱ्यात हा तापलेला हिवाळा आपल्या आणखी कुठल्या गोष्टी दाखवणार, याकडे सगळ्यांचं लक्ष्य आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## विद्यार्थिनींनी अभ्यास करावा : डॉ हनुमंत सौदागर

केज दि १६(प्रतिनिधी) : ध्येय निश्चित केल्याच यश प्राप्ती होते. आई वडिलांचे कष्ट डोळयासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते केज येथील सरस्वती कन्या प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्ष मुख्याध्यापिका श्रीमती डोंगरे,प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर,श्री चाळक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक श्री जोगदंड यांनी केले. यावेळी ते म्हणाले संयमाने जग जिंकता येते असे मत व्यक्त केले.श्री चाळक म्हणाले अभ्यास करून परिस्थिती बदलता येते. अध्यक्षीय समारोप करताना श्रीमती डोंगरे म्हणाल्या शिस्त आणि संस्कार विद्यार्थ्यांच्या अंगी असणे आवश्यक आहे. ज्ञानाची शिदोरी घेऊन जीवन समृद्ध करा असे मत व्यक्त केले. यावेळी श्री ढाकणे,श्री सुसंगे,श्रीमती नेहरकर, श्रीमती मोठाडे आदींची उपस्थिती होती. यावेळी दहावीच्या अनेक विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. पुढे बोलतांना डॉ सौदागर म्हणाले कॉपी पासून दूर राहा. शिक्षणाचा उपयोग व्यवहारीक जीवनामध्ये केला पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाशी आपला संबंध जोडलेला असतो. शिक्षण घेत असताना आपण सर्वप्रथम आपला मार्ग शोधला पाहिजे तरच आपल्याला ते ध्येय साकार करता येईल. विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांशी प्रमाणिक राहून अभ्यास करावा यामुळे आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करता येईल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन नववीच्या विद्यार्थिनीनी केले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## प्रा.सुदर्शन स्वामी यांना पीएच.डी पदवी प्रदान



माजलगाव प्रतिनिधी : येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्रा. सुदर्शन उद्धवराव स्वामी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत इतिहास विषयामध्ये पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे. प्रा.सुदर्शन उद्धवराव स्वामी यांनी प्राचार्य डॉ. गौतम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली "महाराष्ट्रातील अस्पृश्यांचे धर्मांतर : एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स. १९४७ - २००७) " या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. प्रा. सुदर्शन स्वामी यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके,सरचिटणीस आ.सतीश चव्हाण, यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.बी.आर.डक, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ. बी. एल. चव्हाण, प्राचार्य डॉ. जी.के. सानप, प्र.प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे डॉ.बालाजी बोडके, डॉ. अरुण पेंटावार, डॉ.शंकर इप्पर, डॉ. सचिन रुद्रवार, डॉ.डी.एस. शिंदे, डॉ. बिलास काळे, डॉ. सतीश डाके,प्रा. एस. एस. कदम यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## तहसीलदार शेळके यांचा शेतकऱ्यांशी मुक्त संवाद - बैठकीत प्रश्नांवर जागेवर तोडगे

बीड (प्रतिनिधी):- कुर्ला मंडळ मधील मौजे माळापुरी येथे आयोजित करण्यात आलेली महसूल मंडळस्तरीय आढावा बैठक केवळ औपचारिकता न राहता, थेट नागरिकांच्या प्रश्नांना हात घालणारी आणि ‘शासन आपल्या दारी’ या संकल्पनेला मूर्त रूप देणारी लोकाभिमुख संवादसभा ठरली. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र दिसून आले. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या नियमित आढावा बैठका, तपासणी दौरे आणि स्पष्ट सूचनांमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेला नवी दिशा मिळाल्याचे या बैठकीत जाणवले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबवले जात असल्याचे अधोरेखित करण्यात आले. प्रशासन केवळ नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा न राहता, समाजाच्या संवेदनशील प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेणारी व्यवस्था बनावी, या दृष्टीने निर्णय घेतले जात असल्याचे स्पष्ट झाले. बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत अनुदान, ई-पीक नोंदणी, ई-पीक पाहणी, नुकसान भरपाईसाठी आवश्यक कागदपत्रे, आधार कार्ड अद्ययावत ठेवण्याची आवश्यकता तसेच थेट लाभ योजनांचा लाभ घेण्याबाबत, तसेच सेवा मित्र अंतर्गत प्रमाणपत्र यांचे वाटप व मार्गदर्शन करण्यात आले. तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी शांतपणे ऐकून घेत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

## राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये 150 प्रतिमांचे वाटप

बीड । प्रतिनिधी : राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त बीड शहरात अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात 150 प्रतिमांचे वाटप करण्यात आले. शुक्रवार, दि. 13 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी 5 वाजता राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुतळयाजवळ हा कार्यक्रम संपन्न झाला. समाजप्रबोधन, स्वच्छता आणि सेवा या त्यांच्या विचारांचा जागर जागर प्रसार व्हावा, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बीडचे रहिवासी व सध्या धाराशिव पोलीस ठाण्यातून सेवानिवृत्त पीएसआय किशोर रोकडे यांच्या हस्ते प्रतिमांचे वितरण करण्यात आले. त्यांच्या हस्ते झालेल्या या वितरणामुळे कार्यक्रमाला विशेष गौरव प्राप्त झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परीट धोबी समाजसेवा मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष ॲड. सुधीर जाधव हे होते. यावेळी परीट समाजाचे ज्येष्ठ नेते दत्तात्रय नलावडे, राज्य कार्याध्यक्ष गणेश जगताप, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, पप्पू शिंदे, जगन्नाथ शिंदे, रवी जाधव, जिल्हाध्यक्ष मोहन राऊत, गणेश राऊत, जिल्हा सचिव प्रवीण साळुंके, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, मराठवाडा विभागीय युवक उपाध्यक्ष संतोष पवार, उपाध्यक्ष शितल राऊत, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर कार्याध्यक्ष संतोष भालेकर यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्याधिकारीपदी कायमस्वरूपी चिंचाळकर यांची नियुक्ती; धारूरच्या विकासाला मिळणार आता 'बुस्टर' डोस!

### माजी सैनिक संघटनेच्या वतीने नूतन मुख्याधिकार्यांचा जंगी सत्कार; नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

किल्ले धारूर (प्रतिनिधी )

ऐतिहासिक धारूर शहराच्या विकासाचा गाडा आता अधिक वेगाने धावणार आहे. धारूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदी श्री. चिंचाळकर यांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी पदभार स्वीकारला आहे. या नियुक्तीमुळे शहराला आता अनुभवी नगराध्यक्ष आणि



हक्काचे मुख्याधिकारी अशी जोड मिळाल्याने प्रलंबित विकासकामांना मोठी गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

मुख्याधिकारी चिंचाळकर यांनी पदभार स्वीकारताच शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या 'माजी सैनिक संघटनेच्या' वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष दत्ताभाऊ शिनगारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन चिंचाळकर यांचे स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या सत्कार प्रसंगी धारूरचे लोकप्रिय नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी या दोन्ही महत्त्वाच्या पदांवर आता सक्षम व्यक्ती असल्याने धारूर नगरपरिषद एक आदर्श नगरपालिका म्हणून नावारूपास येईल, असा विश्वास नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

यावेळी माजी सैनिक संघटनेचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि नगरपरिषदेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चिंचाळकर यांच्या नियुक्तीचे सर्वच स्तरांतून स्वागत होत आहे.

# जिल्ह्यात सव्वा बाराशे दारू दुकाने असताना नवीन देऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडवु नका

### ॲड. अजित देशमुख यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात दारुने मोठे नुकसान झालेले आहे. राज्यात सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यामध्ये होत आहेत. अशा परिस्थितीत दारू आणखी विकली गेली तर त्याचे समाज विघातक परिणाम होतील. बीड जिल्ह्यात होलसेल दारू दुकाने. बियर बार. बिअर शॉपी. देशी दारू दुकाने यांची संख्या जवळपास साडेबाराशे इतकी आहे. त्यातच दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या दालनात होणाऱ्या बैठकीत आणखी दुकाने मंजूर झाली तर गाव तेथे दारू दुकानाची शाखा अशी परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी आता एकही दारू दुकानाला मंजुरी देऊ नये, असे आवाहन ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यामध्ये दारू दुकानांना मंजुरी देऊ नये, म्हणून आम्ही सातत्याने प्रयत्न केला आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यात आजपर्यंत दुकान दिल्याची माहिती आम्हाला मिळालेली नाही. त्याचप्रमाणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचे देखील काम चांगले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कॉपीमुक्त परीक्षेसाठी केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. अशा परिस्थितीत या अधिकाऱ्यांनी दारू दुकाने वाढू नयेत, यासाठी देखील लक्ष देणे गरजेचे आहे.

बीड जिल्ह्यात आज मित्तीला ८१६ बियर बार, ३१४ बिअर शॉपी, ७८ देशी दारूची दुकाने आणि दारू विक्रीची होलसेल ११ दुकाने अशी एकूण १२१९ (बाराशे एकोणवीस) दुकाने आहेत. जिल्ह्यात ग्रामपंचायतींची संख्या १८०० च्या घरात आहे. जर आता आणखी दुकाने मंजूर होत गेली तर गाव तेथे दारू दुकानाची शाखा अशी परिस्थिती होईल.

दारूमुळे कुटुंब उध्वस्त होतात. ग्रामीण भागाला याचा मोठा तडाखा बसलेला आहे. घरातला एक माणूस दारूडा निघाला तर काही पिढ्या त्याचे परिणाम भोगतात. त्यामुळे दारुड्यांची संख्या कमी होणे गरजेचे आहे. म्हणून दारू दुकाने वाढू नयेत, यासाठी आमचा सातत्याने प्रयत्न असतो.

जिल्ह्यात या दुकानांशिवाय बेकादेशीर रीतीने दारू विकणारे हजारावर दुकाने आहेत. जिल्ह्याला अगोदरच ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून पाहिले जाते. जिल्ह्यात मोठे उद्योग नाहीत. बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्याचबरोबर गुंडगिरीने देखील कळस गाठला आहे. आणखी दारू विक्री वाढली तर आणखी गुन्हेगारी वाढेल, अशी चिन्ह आहेत.

दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी दारू दुकानांना परवाने द्यायचे किंवा नाही याबाबतची बैठक जिल्हाधिकारी यांनी बोलवली असल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. या दिवशी एकाही दुकानाला मंजुरी देऊ नये, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांना देखील या संदर्भात निवेदन देण्यात आले असून एकही दुकान मंजूर होणार नाही, यासाठी आम्ही प्रयत्न करु. दारू दुकान मंजूर करणे हा नियम असला तरी समाजाचा विचार करायला हवा, असे ॲड. अजित देशमुख यांनी

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात घेतली 'व्यसनमुक्तीची' शपथ



**तभा वृत्तसेवा**

धारूर प्रतिनिधी | १६ फेब्रुवारी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या राजमाता जिजाऊ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने 'नशा मुक्ती' अभियानांतर्गत शपथ ग्रहण कार्यक्रम उत्साहात पार पडला. शासनाच्या परिपत्रकानुसार आयोजित या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी अमली पदार्थांपासून दूर राहण्याचा संकल्प केला.

यावेळी मार्गदर्शन करताना रासेयो जिल्हा समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता जाधव म्हणाले की, "युवाशक्ती ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे. कोणत्याही प्रकारच्या अमली व नशा युक्त घटकांपासून दूर राहून तरुणांनी आपले आरोग्य निरोगी राखले पाहिजे. व्यसनाधीनता केवळ व्यक्तीलाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला उद्ध्वस्त करते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून सामाजिक जबाबदारी जोपासावी."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे होते. यावेळी उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, डॉ. इंद्रजीत भगत, प्रा. नागोराव वाघमारे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. सामूहिक शपथ विधीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

बीड,दि.17 : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन दि. 18 व 19 फेब्रुवारी 2026 रोजी यंशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि. 18 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी 5.30 ते 8.30 वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटक दर्याभवानी 40 कलाकारांच्या संचात सादरीकरण होणार आहे. तसेच दि. 19 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10.30 ते 1.00 वाजेपर्यंत त्याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित शाहिरी लोकधारा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

## प्रविण जैन सलग २० वेळा एम.डी.आर.टी. अमेरिका पुरस्कारने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

गेवराई, दि.१७ (प्रतिनिशी)-एम डी आर टी अमेरिका ही संस्था इन्शुरन्स एजंटसाठी काम करते .जगातील सर्व देशातील एजंटाना टारगेट दिले जाते .जानेवारी ते डिसेंबरपर्यंत जे प्रतिनिधी टार्गेट पुर्ण करतील ते एम डी आर टी होतील म्हणजे अमेरिकाच्या संस्थेचे सदस्य होतील .हा इन्शुरन्स कंपनीमध्ये मानाचा बहुमान मानला जातो .हा बहुमान सलग २० वर्ष सातत्याने आयुर्विमा प्रतिनिधी प्रविण जैन यांना मिळाला आहे. माझ्या ग्राहकांच्या व मित्र परिवाराच्या सहकार्याने मी हे यश मिळवत आहे





.या निमित्ताने एकच सांगू इच्छितो करोनानंतर लाईफ इन्शुरन्स व हेल्थ इन्शुरन्स पॉलिसी खूपच आवश्यक झाली आहे .आपल्या कुटुंबाला संरक्षण करण्यासाठी पॉलिसी घेणे खूपच गरजेचे आहे.

कामाचं सातत्य व तत्पर सेवा मी ग्राहकांना देतो त्यामुळे मी गेली 20 वर्ष सातत्याने हा पुरस्कार मिळवत आहे ,अशी भावना जैन यांनी व्यक्त केली.या निमित्ताने सर्व ग्राहकांचे व मित्र परिवाराचे जैन यांनी आभार मानले आहेत. त्या निमित्ताने सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी बीड एल आय सी ऑफिस येथे सिनियर मॅनेजर जोशी , छत्रपती संभाजीनगर डिव्हीजन ऑफिसचे रामप्रसाद राऊत व बीडचे ब्रँच मॅनेजर गणेश औटी यांनी ट्रॉफी देऊन सन्मानित केले. यावेळी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.रोटरी क्लब ऑफ गेवराईचे सचिव प्रविण जैन यांच्या या यशाबद्दल रोटरी क्लबच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## बीडकरांच्या सेवात येत आहे कामधेनू समूह चे 'कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय'

### श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर (पंढरपूर) यांच्या हस्ते होणार शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**

बीड : कामधेनू आरोग्यधाम व आयुर्वेदिक रिसॉर्ट मोरेश्वर देवस्थानजवळ, कोळवाडी, ता. जि. बीड तर कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय हे बीड शहरातील पारनेरकर सभागृहाच्या जवळ, नाट्यगृह रोड, बीड या ठिकाणी सुरू केले जाणार आहे. याचा शुभारंभ श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर (पंढरपूर) यांच्या हस्ते बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा संपन्न होत आहे.

बीडकरांच्या सेवमध्ये मागील तीन तपापासून श्रीनिवास कुलकर्णी आणि मंजुषा श्रीनिवास कुलकर्णी कामधेनू भोजनालयाच्या माध्यमातून घरगुती जेवनाची सेवा सुरू केलेली आहे. केवळ यावरच न थांबता या दांम्पत्यांनी बाहेर गावावून बीड येथे विविध कामासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी २००७ मध्ये मोठा मुलगा सुमीत यांच्या नेतृत्वाखाली कामधेनू अतिथ्य च्याद्वारे मुक्कामाची व्यवस्था उपलब्ध केली. पुढे २०११ मध्ये पशुधन आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी वृध्दाश्रम सुरू केले तेही निसर्गरम्य ठिकाणी पाली घाटाच्या पायथ्याला कोळवाडी या ठिकाणी कामधेनू आरोग्यधाम. या ठिकाणी देशी गायी यांची गोशाळा तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी वृध्दाश्रम साकारले आहे. मुलगा अरविंद याने वैद्यकिय पदवी मिळवली आहे. आता १८ फेब्रुवारी २०२६ रोजी त्याच्या माध्यमातून कामधेनू आयुर्वेसिक चिकित्सालय : केअरसेंडर/ होल्डेज होम/ आयुर्वेसिक रिसॉर्ट या नव्या उपक्रमाचा प्रारंभ केला जात आहे. कामधेनू आरोग्यधाम व आयुर्वेदिक रिसॉर्ट मोरेश्वर देवस्थानजवळ, कोळवाडी, ता. जि. बीड तर कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय हे बीड शहरातील पारनेरकर सभागृहाच्या जवळ, नाट्यगृह रोड, बीड या ठिकाणी सुरू केले जाणार आहे. याचा शुभारंभ श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर (पंढरपूर) यांच्या हस्ते बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वा संपन्न होत आहे.बीडकरांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन मंजुषा व श्रीनिवास कुलकर्णी, गार्गी व सुमित कुलकर्णी, डॉ. अरविंद श्रीनिवास कुलकर्णी व कामधेनू परिवार च्या वतीने करण्यात आले आहे.

**कमधेनू समूह ची वाटचाल**

कामधेनू भोजनालय स्टेडियम रोड, बीड : ३६ वर्षे ( १९९० )

कामधेनू अतिथ्य सहयोगनगर, बीड : २१ वर्षे ( २००७)

कामधेनू आरोग्यधाम व गोशाळा कोळवाडी, ता. जि. बीड : १६ वर्षे ( २०११)

आवर्तन आर्किटेक्टस् सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड : ५ वर्षे ( २०२१ )

कामधेनू आरोग्यधाम व आयुर्वेदिक रिसॉर्ट मोरेश्वर देवस्थानजवळ, कोळवाडी, ता. जि. बीड : १८ फेब्रुवारी २०२६

कामधेनू आयुर्वेदिक चिकित्सालय, पारनेरकर सभागृहाच्या जवळ, नाट्यगृह रोड, बीड. १८ फेब्रुवारी २०२६

## पोलीस भरतीत मैदानी चाचणी अपूर्ण असलेल्या उमेदवारांना पुन्हा संधी

बीड, 17 फेब्रुवारी : बीड येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर सुरू असलेल्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेदरम्यान विविध कारणांमुळे मैदानी चाचणी पूर्ण करू न शकलेल्या उमेदवारांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. अशा उमेदवारांना एक अतिरिक्त संधी देण्यात आली असून त्यांनी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७ वाजता पोलीस मुख्यालय बीड येथे मैदानी चाचणीसाठी हजर राहावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. बीड जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई पदासाठी भरती प्रक्रिया सुरू आहे.

# श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान महादेव मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

बीड शहरवासीयांच्या नवसाला पावणारा असा श्री सोमेश्वर महादेव आहे ज्यांची संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये ख्याती आहे असे जागृत असलेले बीड शहरातील बार्शी रोडवरील श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या श्री अखंड हरिनाम सप्ताहाची हजारो भाविकांनी महाप्रसाद सेवन केला व मोठ्या उत्साहात झाली सांगता .

**तभा वृत्तसेवा**

बीड प्रतिनिधी. : बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे असे श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अतिशय मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात नऊ तारखेला झाली होती गेल्या सहा ते सात दिवसापासून श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी तसेच त्या परिसरामध्ये सर्व आनंदमय पवित्र आणि भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या सप्ताहामध्ये धार्मिक कार्यक्रमाचे विविध आयोजकांकडून आयोजन करण्यात आले होते यामध्ये सकाळी पाच वाजता काकडा हरिपाठ गाथा भजन श्री विष्णू सहस्त्रनाम श्री भावार्थरामायण इत्यादी



महान अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी झाले तसेच प्रवचन सायंकाळी महाराष्ट्रातील नामांकित असणाऱ्या गुन्हिजन हरिभक्त परायण महाराजांचे हरिकीर्तन या ठिकाणी संपन्न झाले त्यांनी सर्व या पंचक्रोशीतील भाविक भक्तांना आपल्या आपल्या उत्कृष्ट ज्ञानातून ज्ञान अमृत पाजले व सर्वांना भाविक भक्तांना हरिकीर्तनाने तृप्त केले असे या मंदिर परिसरामध्ये वातावरण गेल्या सहा दिवसांमध्ये पाहायला मिळाले याच सप्ताहाची सांगता सोमवारी मोठ्या उत्साहामध्ये भगवान श्री सोमेश्वर महादेवाची दिव्य भव्य अशी महापूजा रुद्राभिषेक संपन्न होऊन तसेच या ठिकाणी स्थापित असलेल्या सर्व देव त्यांचे पूजन होऊन मोठ्या उत्साहात या सप्ताहाची सांगता संपन्न झाली व या वेळी बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील हजारो भाविक भक्त या ठिकाणी महाप्रसादासाठी उपस्थित होते या ठिकाणी अतिशय शिस्तीमध्ये सर्व चोक व्यवस्था मंदिर ट्रस्टीच्या वतीने श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले होती या वेळी ट्रस्टीचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाची महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विश्वस्त यांनी असे उत्कृष्ट धार्मिक कार्यक्रमाचे या ठिकाणी आयोजन केले.

महाशिवरात्रीच्या दिवशी प्रसिद्ध असलेल्या बीड शहरातील श्री सोमेश्वर मंदिर संस्थान येथे जवळपास बीड शहरातील जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील 70 ते 80 हजार भाविकांनी दर्शन घेतले तसेच आठ दिवस चालणाऱ्या सप्ताहामध्ये जवळपास 60 ते 65 हजार भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला व श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान मंदिर येथे जसे की साई बीड येथील संस्थान शिर्डी येथील तसेच चाकरवाडी श्री क्षेत्र नारायण गड भगवानगड पेंडगाव चा मारुती या ठिकाणी गेलेला प्रत्येक भाविक भक्त किंवा गोरगरीब भक्त जे अन्नछत्र चालवले जातेत त्या महाप्रसादाचे सेवन केल्याशिवाय जात नाहीत त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर संस्थान बीड येथे पण आपण भविष्यात दर सोमवारी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी आपण अन्नछत्र या ठिकाणी ठेवणार असल्याचे या श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश उपाध्यक्ष देव देश धर्म या कार्यामध्ये सातत्याने अग्रेसर असलेले असे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी या सप्ताहाच्या निमित्ताने या ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्व हजारो भाविक भक्तांसमोर आपले उत्कृष्ट सुसंस्कृत मनोगत व्यक्त केले या वेळी येथे हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते .

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यात ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी अधिसूचना जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० नुसार जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रांच्या वापराबाबत अधिसूचना जारी केली आहे. श्रोतगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांव्यतिरिक्त इतर ठिकाणी वर्षभरात १५ दिवस ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजेपासून रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक/ध्वनिवर्धक वापरण्याची सूट देण्यात आली आहे.

यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा १ दिवस, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा १ दिवस, श्रीगणेश उत्सव काळात पाचवा गौरी विसर्जन, सातवा, अनंत चतुर्दशीचा आदला दिवस व अनंत चतुर्दशी असे एकूण ४ दिवस, नवरात्र उत्सव काळात अष्टमी व नवमी असे २ दिवस, दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजन व दिवाळी पाडवा असे २ दिवस, ईद-ए-मिलादचा १ दिवस, ख्रिसमसचा १ दिवस आणि ३१ डिसेंबररोजी १ दिवस असे १३ दिवस आणि उर्वरित २ दिवस ध्वनी प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक लातूर यांच्या शिफारसीनुसार जिल्ह्यातील महत्त्वाच्या कार्यक्रमांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने सूट देण्यात येणार आहे.




## विविध वृत्त...

### सैनिक कल्याण विभागात ७२ लिपिक-टंकलेखक पदांसाठी १४ मार्चला ऑनलाईन परीक्षा

**लातूर :** सैनिक कल्याण विभाग आणि त्याअंतर्गत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत गट-क संवर्गातील लिपिक-टंकलेखक पदांच्या एकूण ७२ रिक्त जागांसाठी टीसीएस-आयओएनमार्फत ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा १४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत घेतली जाईल. या पदांसाठी अर्ज केलेल्या लातूर जिल्ह्यातील सर्व उमेदवारांनी वरील नमूद वेळेत परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

### गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसाठी विधी अधिकारी नेमणुकीसाठी अर्ज मागवले

**लातूर :** शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना (खंडित कालावधी) व सानुग्रह अनुदान योजनेतंर्गत न्यायालयीन प्रकरणांच्या कामकाजासाठी विधीज्ञ तथा विधी अधिकारी नेमण्यात येणार आहे.



यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच किंवा राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगात वकिलीचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.

महाराष्ट्र/गोवा बार कौन्सिलच्या दरपत्रकानुसार जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंचमधील प्रति केससाठी १० हजार रुपये आणि राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगातील प्रति केससाठी ५० हजार रुपये मानधन दिले जाईल. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज वक्षवरश्रर्रीीशवळषषारळश्र.लो या ई-मेल आयडीवर २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पाठवावेत, असे लातूर विभागीय कृषी सहसंचालक, लातूर विभाग लातूर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### मेस्को लातूर अंतर्गत सुरक्षा रक्षकांच्या अनेक रिक्त जागा; माजी सैनिक, पाल्य, पत्नी व विधवांनी २७ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावेत

**लातूर :** माजी सैनिक सहाय्यक योजना अंतर्गत मेस्कोच्या लातूर क्षेत्रीय कार्यालय येथे बीड आणि नांदेड जिल्ह्यांतील विविध ठिकाणी सुरक्षा रक्षक पदांच्या रिक्त जागा उपलब्ध आहेत. या पदांसाठी माजी सैनिक, माजी सैनिकांचे पाल्य, माजी सैनिकांच्या पत्नी तसेच माजी सैनिकांच्या विधवा यांना प्राधान्याने संधी देण्यात येत आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी आपले अर्ज, सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मेस्को क्षेत्रीय कार्यालय, लातूर येथे स्वतः जाऊन कागदपत्रे जमा करून नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

### 'एमएसआरटीसी'च्या बस प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड योजना सुरू

**लातूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) ने प्रवाशांना सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'रुपे ऑन द गो, एनसीएमसी इनेबल्ड' कार्ड योजना राज्यभरात कार्यान्वित करण्यास सुरुवात केली आहे. या कार्डद्वारे सवलतधारक (विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला इ.), विनासवलत प्रवासी आणि सामान्य प्रवासी यांना एकाच कार्डमध्ये प्रवास पास, ऑनलाइन वॉलेट आणि ऑफलाइन वॉलेट उपलब्ध होणार आहे.

हे कार्ड वैयक्तिक स्वरूपाचे असून त्यावर व्यक्तीचे नाव आणि फोटोसह माहिती अंकित असेल. हे कार्ड अहस्तांतरणीय असून सवलतीच्या तिकीटासाठी अनिवार्य राहणार आहे. कार्डची नोंदणी आणि वितरण एमएसआरटीसीच्या २५१ आगारातील अधिकृत एजंट, ३३५ वाहतूक नियंत्रण कक्ष तसेच एनएसडीएल पेमेंट बँकेद्वारे नियुक्त होणाऱ्या ३००० पेक्षा अधिक अधिकृत एजंट यांच्यामार्फत होईल. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून नोंदणी पूर्ण झाल्यानंतर साधारण ३० दिवसांत कार्ड वितरित केले जाईल. कार्ड मिळाल्यानंतर पीओएस यंत्राद्वारे सक्रियकरण करावे लागेल. सवलतधारक प्रवाशांना (विद्यार्थी, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक इ.) या कार्डचा लाभ मिळेल. प्रवासादरम्यान घेतलेले तिकीट सांभाळणे ही प्रवाशांची जबाबदारी राहील. राज्य परिवहन महामंडळाने या डिजिटल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# भूकंपामुळे इमारत कोसळली; जखमींना तातडीने मदत मिळाली !

## * आपत्ती व्यवस्थापनाच्या रंगीत तालमीत शोध व बचाव मोहिमेचे प्रात्यक्षिक
## * पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल
## * राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकाने आठ जणांचा जीव वाचविला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** जिल्हा क्रीडा संकुल परिसरात आज सकाळी साडेअकरा वाजता मोठा आवाज झाला. भूकंपाच्या धक्क्याने येथील इमारत कोसळल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षाला या घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीवरून स्थानिक अग्निशमन पथक, आपदा मित्रांचे शोध व बचाव पथक तसेच रुग्णवाहिका आणि आरोग्य पथक त्वरित घटनास्थळी दाखल झाले. हा प्रसंग जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भूकंप विषयक आपत्ती व्यवस्थापनाच्या रंगीत तालमीचा होता.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर-घुगे, औसा-रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, औसा तहसीलदार घनश्याम अडसूळ, पुणे येथील एनडीआरएफचे सहाय्यक कमांडंट गौरव जांकटे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

भूकंपामुळे दुमजली इमारत कोसळल्याची माहिती मिळताच पोलीस नियंत्रण लातूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला आणि आरोग्य विभागालाही तात्काळ सूचित करण्यात आले. पोलीस पथक, अग्निशमन वाहन, होमगार्ड, रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक, आपदा मित्र हे काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. 'इन्सीडंट रेस्पॉन्स सिस्टम' (आयआरएस) नुसार इन्सीडंट कमांडर, ऑपरेशनल चीफ, लायझन ऑफिसर, इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर प्रभारी, जनसंपर्क अधिकारी यांनी त्वरित जबाबदाऱ्या पार पाडल्या. घटनास्थळी वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आणि इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर कार्यान्वित झाले.

पोलिसांनी परिसरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविले. पोलीस, आपदा मित्र आणि अग्निशमन दलाने जखमींचा शोध घेऊन त्यांना वैद्यकीय पथकाकडे पाठवण्यास सुरुवात केली. इमारतीत लागलेली आग अग्निशमन पथकाने नियंत्रणात आणली. इमारतीखाली काही जण अडकले असण्याची शक्यता लक्षात घेऊन इन्सीडंट कमांडरांनी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाशी (एनडीआरएफ) संपर्क साधला आणि शोध व बचाव पथक मागवले.

एनडीआरएफ पथक दाखल होण्यापूर्वी स्थानिक पथकांनी चार जखमींना उपचारासाठी रवाना केले. अजयकुमार



यादव यांच्या नेतृत्वाखालील एनडीआरएफ पथकाने घटनास्थळी पोहोचून इन्सीडंट कमांडर घनश्याम अडसूळ यांच्याकडून परिस्थिती जाणून घेतली. इमारतीत आणखी आठ जण अडकले असल्याचे समजताच त्यांनी शोध कार्य सुरू केले. मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या पाच जणांची सुटका करून त्यांना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी पाठवण्यात आले. इतर व्यक्तीचा ठावठिकाणा समजत नसल्याने एनडीआरएफच्या प्रशिक्षित श्र्वान पथकाची मदत घेण्यात आली. श्र्वानाने ढिगाऱ्याखाली अडकलेल्या एका व्यक्तीचे ठिकाण शोधून दिले. विविध साधनांचा वापर करून बेशुद्धावस्थेतील गंभीर जखमीला बाहेर काढण्यात आले आणि त्यालाही रुग्णवाहिकेतून उपचारासाठी पाठवले.

भूकंपग्रस्त इमारतीच्या लगत असलेल्या एका बसमध्ये एक व्यक्ती अडकल्याची माहिती मिळताच ऑपरेशनल चीफने एनडीआरएफ पथकाला सूचना दिल्या. कटिंग टीम आणि व्हीएलएस उपकरणांच्या सहाय्याने त्या व्यक्तीची सुखरूप सुटका करण्यात आली. श्र्वान पथकाच्या मदतीने तपासणी करून इमारतीत आणखी कोणी अडकले नसल्याची खात्री पटल्यानंतर इन्सीडंट कमांडरांनी शोध व बचाव मोहीम थांबवल्याची घोषणा केली.

भूकंपासारख्या आपत्तीच्या वेळी सर्व शासकीय यंत्रणांमध्ये समन्वय साधणे, त्यांची क्षमता वाढवणे यासाठी ही रंगीत तालिम आयोजित करण्यात आली होती. सर्व यंत्रणांनी आपली जबाबदारी चोखपणे बजावली आणि जखमींना तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली. याप्रसंगी तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी इन्सीडंट कमांडर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी यांनी डेप्युटी इन्सिडेंट कमांडर म्हणून जबाबदारी पार पाडली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ लातूर उपकेंद्राचे डॉ. प्रमोद पाटील, एम. ए. खान, महानगर गॅसचे सेफ्टी ऑफिसर अक्षय कुचेकर यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले.

### स्थानिक बचाव पथकांसाठी लवकरच प्रशिक्षणाचे आयोजन : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

काही महिन्यांपूर्वी जिल्ह्यात आलेल्या पूर परिस्थितीत स्थानिक शोध व बचाव पथकांनी उत्तम कामगिरी केली होती. भूकंपासारख्या आपत्तीच्या वेळी नागरिकांना तातडीने मदत मिळावी यासाठी स्थानिक पथकांना एनडीआरएफच्या सहकार्याने लवकरच प्रशिक्षण आयोजित केले जाईल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच या रंगीत तालमीत सर्व विभागांनी चांगली कामगिरी केल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी विविध पथके आणि साहित्य दालनांना भेट देऊन पाहणी केली.

## लातुरात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आज सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील बार्शी रोडवरील दयानंद सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**सर्वांना विनामुल्य प्रवेश; कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे**

यावेळी 'आम्ही जिजाऊच्या लेकी' या कार्यक्रमांतर्गत शिवचरित्र, शाहिरी पोवाडे, स्फुर्तीगीते व लोकगीतांचे सादरीकरण केले जाणार आहे. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांची गौरवगाथा, त्यांचा पराक्रम व प्रेरणादायी जीवन नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### संस्कारक्षम पिढी घडवणे काळाची गरज : तांदळे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** मुलांना केवळ अक्षर ओळख करून देणे पुरेसे नसून; त्यांना संस्कारक्षम बनवणे, श्रमाची सवय लावणे, आरोग्याची जाणीव करून देणे आणि पर्यावरण संवर्धनाची शिकवण देणे ही आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी

साने गुरुजी आयआयटी फाउंडेशन व साने गुरुजी बालविकास केंद्र यांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसंगी केले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लातूर उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख, माझं घर या अनाथ प्रकल्पाचे संस्थापक शरद झरे उपस्थित होते. या प्रसंगी नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख व शरद झरे यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर संस्था सचिव सुरेखा माने, प्रकाश माने, प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने, उषा आडे आणि नागोराव कांबळे, आयआयटी फाउंडेशनच्या प्राचार्या यू. एस. देशमुख तसेच बालविकास केंद्राच्या प्रमुख वर्षा भगत उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्था सचिव कालिदास माने यांनी उपस्थित पाहुण्यांना संस्थेचा आढावा देत संस्थेते घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाची तोंडओळख करून दिली. कार्यक्रमाचे संचलन शिवकांता मुर्गे व मीनाक्षी यादव यांनी केले, तर आभार प्राचार्य यू. एस. देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महाकाल प्रतिष्ठान व रामलिंगेश्वर देवस्थानच्या संयुक्त विद्यमाने खंडेरायाचा हळदी व विवाह सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** महाकाल प्रतिष्ठान, लातूर यांच्या वतीने व रामलिंगेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ फेब्रुवारी रोजी श्री खंडेरायाचा हळदी सोहळा तर १५ फेब्रुवारी रोजी भव्य विवाह सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. दोन दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्याने लातूर शहरात भक्तीमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

गावभागात अति श्रद्धेने पूजले जाणारे बाबा महाकाल हे नगर भ्रमणासाठी वर्षातून केवळ महाशिवरात्रीच्या दिवशीच बाहेर आणले जातात. या दिवशी निघणाऱ्या पालखी सोहळ्याचे गावभागातील नागरिक मोठ्या भक्तिभावाने स्वागत करतात. जणू महाकाल महाराज आपल्या प्रजेच्या हालचाली जाणून घेण्यासाठी आले आहेत, अशा भावनेने नागरिक पालखीचे स्वागत करत दिवाळीप्रमाणे उत्सव साजरा करतात. घराघरांत रांगोळ्या, फुलांची उधळण, दीपप्रज्वलन आणि जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून जातो.

यंदाच्या वर्षीही लातूरकरांसाठी ही पर्वणी विशेष उत्साहात साजरी करण्यात आली. पालखी मार्गक्रमण सोहळ्याची सुरुवात लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास अधिक प्रतिष्ठा लाभली. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी अशा सोहळ्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

हळदी व विवाह सोहळ्याचा जिवंत देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पारंपरिक वेशभूषा, डमरू-ताशांचा गजर, वेदमंत्रांचे उच्चारण, फुलांची आकर्षक सजावट आणि भक्तिमय वातावरण यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. खंडेरायाच्या विवाह सोहळ्यातील प्रत्येक विधी अत्यंत पारंपरिक पद्धतीने सादर करण्यात आला, ज्यामुळे उपस्थित भाविकांना जणू प्रत्यक्ष दैवी विवाह सोहळ्याचा अनुभव मिळाला.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे युवक वर्गाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग. महाकाल प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवकांमध्ये सनातन धर्माचे या युगातील महत्त्व पटवून देण्यावर विशेष भर देण्यात येतो. आधुनिक युगातील वेगवान जीवनशैलीत तरुण पिढीने आपल्या संस्कृतीशी जोडलेले राहणे, धार्मिक परंपरांचा अभिमान बाळगणे आणि



समाजहितासाठी कार्य करणे किती आवश्यक आहे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

भक्तिमार्गातून निर्व्यसनी व संस्कारी जीवन कसे जगता येईल, यावरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. व्यसनमुक्ती, शिस्तबद्ध दिनचर्या, वडीलधाऱ्यांचा आदर, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. धार्मिक कार्यक्रम हे केवळ उत्सव नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

महाकाल प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशा धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांना योग्य दिशा देण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे. लातूरकरांसाठी हा सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचा उत्सव ठरला.

## एमआयटी लातूर येथे श्री गणेश, श्री महालक्ष्मी, श्री हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना, कलशारोहण आणि विश्वमैदान लोकार्पण सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ फेब्रुवारी :** माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने दि. २० ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विश्र्वमैदाण परिसरात भव्य अशा श्री गणेश, श्री महालक्ष्मी, श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा आणि एक लाख स्क्वेअर फूट क्षेत्रफळाच्या 'विश्वमैदान' क्रीडा संकुलाचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

येथील एमआयटी शिक्षण संकुलातील विश्वमैदान परिसरात नव्याने साकारण्यात आलेल्या श्री गणेश, श्री महालक्ष्मी आणि श्री हनुमान मंदिरांच्या मूर्तींची विधिवत 'प्राणप्रतिष्ठापना' करण्यात येणार असून यानिमित्त तीन दिवस धार्मिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांसाठी आयोजित करण्यात आली आहे.

माईर एमआयटी शिक्षण संस्था समुहाचे संस्थापक



विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, माईर एमआयटीचे विश्वस्त श्री. तुळशीराम दा. कराड, प्रगतशील शेतकरी श्री काशिराम दा. कराड यांच्या प्रेरणा आणि आशिर्वादाने होत असलेल्या या सोहळ्यासाठी ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, ह.भ.प. विद्यानंद महाराज गातेगाव, ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्री, ह.भ.प. विठ्ठल महाराज फड, शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, ममता हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. मधुकर कुलकर्णी, सह-अध्यक्षा डॉ. माया कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमाची सुरुवात दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता विणापूजन व मिरवणुकीने करण्यात येणार आहे. त्यानंतर दिवसभर श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, देवता स्थापना, जलाधिवास, नवग्रह स्थापना, हवन, शय्याधिवास आदी विधी पार पडतील. सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ व ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. केशव महाराज घुले यांच्या किर्तनाचा कार्यक्रम होईल. त्याचबरोबर दि. २१ फेब्रुवारी रोजी प्रासाद वास्तु, कुटीर होम, मुख्य देवता हवन, स्नपनविधी आदी धार्मिक विधी होणार आहेत. सायंकाळी ४.३० ते ६ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम होईल. त्यानंतर ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. वामन महाराज जाधव यांचे किर्तन होईल.

तर दि. २२ फेब्रुवारी रोजी प्रातःपूजन, मूर्ती स्थापना, कलशारोहण, उत्तरांग हवन व बलिदान विधी संपन्न होतील. सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्र्वर पिंप्री यांचे किर्तन होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ ते ११.३० या वेळेत महापूर्णाहुती, महानैवेद्य दुपारी १२ वाजता, महाआरती १२.३० ते १ आणि महाप्रसाद १ ते ३ या वेळेत होणार आहे.

यज्ञप्रमुख आचार्य म्हणून वे.शा. संपन्न श्री रामकृष्ण कुलकर्णी गुरुजी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या सोहळ्यासाठी अनेक कीर्तनकार, भजनकार, टाळकरी व कलाकार यांची उपस्थिती लाभणार आहे.'शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर शरीर, मन आणि आत्म्याचा सर्वांगीण विकास' या ध्येयाने प्रेरित होऊन आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास सर्व भाविक-भक्तांनी व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन माईर एमआयटी शिक्षण संस्था समुहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.



# रेतीची अवैध साठवणुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ फेब्रूवारी-**

गोदावरी नदीपात्रातून अवैध रेती उपसा करुन त्याची साठवणूक करणाऱ्या पाच जणांविरुध्द ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, या कारवाईत दहा लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड तालुक्यातील मार्वेंड शिवारात अवैधरित्या उपसा केलेली रेती साठवणूक केली असल्याची माहिती मिळाल्यावरुन ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने दि.१६ फेब्रुवारी रोजी छापा टाकून पाच ब्रास रेती, एक इंजिन, पंधरा तराफे असा एकूण दहा लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच तराफे जाळुन नष्ट केली. या प्रकरणी बालाजी लामदाडे, बाबुराव क्षीरसागर, मदन येवले व अन्य दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोहेकॉ. विठ्ठल शिंदे, असिफ आदींच्या पथकाने केली.

# जिल्हाधिकाऱ्यांची लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयास भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ फेब्रूवारी-**

इयत्ता बारावीच्या सुरू असलेल्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी आज धर्माबाद येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय या परीक्षा केंद्राला भेट देऊन व्यवस्थेचा आढावा घेतला.

भेटीदरम्यान त्यांनी परीक्षा केंद्रावरील प्रश्नपत्रिका सुरक्षित साठवणूक व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था, परीक्षा हॉलमधील शिस्त, तसेच पर्यवेक्षकांची उपस्थिती यांची पाहणी केली. परीक्षा सुरळीत, पारदर्शक व कॉपी मुक्त वातावरणात पार पडावी यासाठी केंद्रावर करण्यात



आलेल्या नियोजनाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, प्रकाश व्यवस्था तसेच आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचेही त्यांनी पाहिले. केंद्रप्रमुख व शिक्षकांनी जबाबदारीने व नियोजनबद्ध पद्धतीने परीक्षा व्यवस्थापन केल्याबद्दल जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी त्यांचे कौतुक केले.

जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांनी याच पद्धतीने काटेकोरपणे नियमांचे पालन करून परीक्षा पार पाडाव्यात, तसेच विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराला बळी न पडता आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# साईबाबा मंदिर कमान अतिक्रमणाच्या विळख्यात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ फेब्रूवारी-**

महापालिकेच्या हद्दीत असलेल्या कौठा येथील साईबाबा मंदिर कमान अतिक्रमणाच्या विळख्यात सापडली असून मनपा प्रशासनाने यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

कौठा येथील साईबाबा मंदिर कमानीला काही दिवसापूर्वी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने कमानीचा आधार स्तंभ कोसळला. दरम्यान सदर कमानीतून वसरणीकडे जाणारा मार्ग असून रात्रंदिवस वाहनाची रेलचेल सुरू असते त्यामुळे

अतिक्रमण न हटविल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वसरणीकडे



मार्गालगतही पान टपऱ्या व जाणाऱ्या ईतर छोटी दुकाने थाटण्यात आली आहेत त्याचा त्रास या भागातील नागरिकांना सहन करावा लागत असून सदरील अतिक्रमण हटविण्याची मागणी या भागातील नागरिकांमधून होत आहे.

# सीआरपीएफ जवान श्रीराम चिगळेचे आदमपुरात जंगी स्वागत

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १७ फेब्रूवारी-**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील युवा सीआरपीएफ जवान श्रीराम धोंडिबा चिगळे हा केंद्रीय राखीव पोलीस दलातील खडतर प्रशिक्षण पूर्ण करून सोमवार दि.१६ फेब्रुवारी सायंकाळी गावी परतल्याने आदमपूरात त्याचे गावकऱ्यांकडून वाजत गाजत पारंपरिक घोड्यावरून स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

येथील अल्पभूधारक शेतकरी धोंडिबा चिगळे व आई सौ.विमलबाई चिगळे यांचे हे एकुलते एक पुत्र आहेत. सन २०२४ डिसेंबर अखेरीस यांची 'सीआरपीएफ-ट्रेड्समन' म्हणून निवड झाली होती. जि.प.शाळा व महाळप्पा पटने विद्यालयात प्राथमिक,माध्यमिक, सौ.मंजुळाबाई महाविद्यालय येथे उच्च माध्यमिक तर नायगांव येथील श्री दत्त महाविद्यालयात पदवीचे मुक्त शिक्षण त्याने घेतलेले आहे. त्यानंतर तब्बल अकरा महिन्यांचे पायाभूत खडतर सैन्य प्रशिक्षण तमिळनाडूतील चेन्नई केंद्रात पूर्ण झाले आहे.प्रशिक्षण पूर्ण होताच



लगोलग त्याची छत्तीसगड राज्यात नेमणूक झालेली आहे.गावी व शहरात राहून त्याने हे यश मिळवून आपल्या आई वडीलांचे कष्टप्रद श्रम सार्थकी ठरवले आहे.

या आगमनाबद्दल आई,वडील, आजी माजी ग्रामपंचायत प्रतिनिधी, सहशिक्षक,व्यावसायिक, व्यापारी, पत्रकार, गावातील प्रतिष्ठित नागरिक,नातलग,मित्र व समस्त गावकऱ्यांनी श्रीराम चे स्वागत,सत्कार करीत अभिनंदन केले आहे.देशाची सेवा करण्याची अभूतपूर्व संधी आणि देशसेवेत ग्रामीण भागातील अधिकाधिक तरूणांनी यावे, अशा प्रेरक भावना श्रीरामने दै.तरुण भारत प्रतिनिधींशी व्यक्त केल्या आहेत.



## राज्यशास्त्र व लोकप्रशासन विद्यार्थ्यांची तालुका न्यायालयाला भेट

**नांदेड-**उमरी येथील न्यायाधीश के.एस. कुलकर्णी यांच्या संमतीने तालुका विधी समिती उमरी व कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग यांच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाज पाहता यावे यासाठी दिवाणी तालुका न्यायालय क स्तर उमरी येथे अभ्यास सहल काढण्यात आली. न्यायालयात प्रत्यक्ष खटल्या सोबतच मुद्देमाल, ई-फाईलिंग ईत्यादी बाबतची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. या अभ्यास सहलीत न्यायालयीन कर्मचारी, अभिवक्ता संघ उमरीचे सर्व सदस्य, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.नवनाथ अडकिणे, डॉ. जळबा हाटकर, डॉ. किशोर उघडे, डॉ. अप्पाराव जाधव व राज्यशास्त्र, लोकप्रशासन विषयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**मुदखेड-** मुदखेड येथील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल, मध्ये दि.१४ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. शाळेमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच शाळेच्या वतीने शैक्षणीक वर्ष २०२५-२६ मधील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी काढण्यात आले.यामध्ये शिवराज विनोद चौदंते, ऋतिका बाळकृष्ण चौदंते, दिव्या बालाजी चबलवाड या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे सर यांनी केले.ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी अंतर्भूत कलागुणांना वाव देण्यासाठी आपल्या स्व -आवडीचे क्षेत्रनिवडून त्यात उत्तुंग यश संपादन करावे. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये कु. ऋतिका बाळकृष्ण चौदंते आपल्या भाषणातून शाळेविषयी तीन वर्षांत आलेले अनुभव व शाळेतील गुणवत्ता, शिस्त याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच आपल्या गुरुजनांबद्दल आदर व्यक्त केला.शिवराज चौदंते याने तीन वर्षात आलेला आपला अनुभव थोडक्यात व्यक्त केला व शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेचे सचिव तथा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नारायण गैणवाड सर यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सहनशीलता, मेहनत ,नम्रता जीवनात आत्मसात करून आपले जीवन उज्ज्वल बनवावे.तसेच संस्थेचे तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष केशवराव कदम सर आपल्या अध्यक्षीय समारोप पर भाषणात म्हणाले की सर्व विद्यार्थ्यांनी वेळेचा सदुपयोग करून आपले भविष्य उज्ज्वल बनवावे. तसेच सरदार वल्लभभाई पटेल प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. हेमलता पुरोहित ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.शाळेतील क्रीडा विभाग प्रमुख एम.जी.गाडेगावकर यांनी विद्यार्थ्यांना खेळांविषयी विशेष प्रोत्साहन व मार्गदर्शन केले.सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.शेवटी सांस्कृतिक प्रमुख जी.एम.पोगरे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

# माडपेलीवार कुटुंबियांचे आ. केरामांनी केले सांत्वन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १७ फेब्रूवारी-**

शहरातील शासकीय कंत्राटदार वेंकना माडपेलीवार यांच्या मातोश्री इंदिराबाई नरसिंगराव माडपेलीवार यांचे नुकतेच दुःखद निधन झाले.त्या माजी नगराध्यक्ष स्व. गोपालराव नेमानीवार यांच्या बहिण होत्या.

या दुःखद प्रसंगी किनवट माहूर विधानसभा मतदारसंघ आमदार भीमराव केराम यांनी रामनगर, येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन माडपेलीवार कुटुंबीयांची भेट घेतली व मनःपूर्वक सांत्वन केले. यावेळी माजी नगरसेवक रामराव ईटकेपेलीवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, किशनराव



नेम्मानिवार, सुनील एड्डलवार, भाजप शहराध्यक्ष स्वागत आयनेनिवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# गोरटे येथे २७ रोजी सहावे मराठी साहित्य संमेलन उद्घाटक कर्डिले तर अध्यक्ष डॉ. पी. विठ्ठल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ फेब्रूवारी-**

वरदानंद प्रतिष्ठान गोरटे तालुका उमरी जिल्हा नांदेड यांच्यावतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी रोजी अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य ज्येष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीक्षेत्र गोरटे येथे ६ वे मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी , समीक्षक तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा संकुलातील प्रा. डॉ. पी. विठ्ठल यांची निवड करण्यात आली असून स्वागत अध्यक्ष पदी वरदानंद प्रतिष्ठान गोरटेचे संचालक तथा महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सेवानिवृत्त प्रबंधक अशोक भाऊराव फुलारी यांची निवड करण्यात आली आहे.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त गोरटे येथे काशिवन समाधी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या संमेलनाची सुरुवात सकाळी साडेआठ वाजता गोरटे गावातून काशिवन समाधी परिसराकडे ग्रंथदिंडीने होईल. ग्रंथदिंडीचे पूजन कृषी उत्पन्न बाजार समिती उमरी चे सभापती शिरीष देशमुख गोरठेकर यांच्या हस्ते करण्यात येणार असून यावेळी रावसाहेब सावंत , पिराजी मिरेवाड यांच्यासह श्री संत दासगणू सांप्रदायिक भजनी मंडळ यांची उपस्थिती राहणार आहे .

छायाचित्रकार संतोष तळेगावे निर्मित नांदेड जिल्ह्यातील साहित्यिकांच्या छायाचित्र प्रदर्शन भरवण्यात येणार असून प्रभाकर कानडखेडकर यांच्या हस्ते या छायाचित्राचे उद्धाटन होईल. . संमेलनाचा मुख्य उद्धाटकीय सोहळा सकाळी साडेनऊ वाजता सुरू होणार असून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले हे या संमेलनाचे उद्धाटन करतील. यावेळी काशीबाई भाऊराव फुलारी स्मृती नारायणी पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात येणार आहे.



साहित्य संमेलनास मावळते संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ कवी प्रभाकर साळेगावकर, दत्ता डांगे , शंकर वाडेवाले, संपादक शंतनु डोईफोडे , ड विजयकुमार भोपी , दिगंबर कदम , प्रा. महेश मोरे , डॉ. यू एल जाधव , ड भाऊसाहेब देशमुख गोरठेकर , मारोतराव कवळे गुरुजी , डॉ माधव विभुते, डॉ. रामेश्वर भाले, अनिलकुमार होळकर, जगन शेळके, दिगंबर देशमुख आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे .

प्रा. मुकुंद राजपंखे यांच्या अध्यक्षतेखाली मान्यवर कवींचे कवी संमेलन रंगणार असून तत्पूर्वी बालाजी इबितदार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या कथाकथनात राम तरटे, धाराशिव शिराळे , माधव चौधरी यांचे कथाकथन होणार आहे .

या सहाव्या मराठी साहित्य संमेलनाला उपस्थित राहावे असे आवाहन केशव रामदास ,हिमांशू अशोक, प्रणव देवीदास , करण विठ्ठल आणि समस्त फुलारी परिवारांनी केले आहे. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी समिती परिश्रम घेत आहे.

**काशीबाई भाऊराव फुलारी स्मृति नारायणी पुरस्काराचे मानकरी**

वरदानंद प्रतिष्ठान गोरटे च्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित सहाव्या मराठी साहित्य संमेलनात काशीबाई भाऊराव फुलारी स्मृति नारायणी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सहारा अनाथालय गेवराई च्या संचालिका सौ प्रीती संतोष गर्जे ह्या यावर्षीच्या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत.

# विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबत सामाजिक विकासही नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून साध्य होणार : डॉ. नितीन करमळकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ फेब्रूवारी-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे घटक व त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे उपक्रम या विषयावरील कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे माजी कुलगुरू तथा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. नितीन करमळकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन केले.

ते म्हणाले की, गेल्या ७०७५ वर्षांत अभ्यासक्रमात फारसा बदल झाला नव्हता; मात्र नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम, कौशल्यविकास आणि सामाजिक भान या सर्व बाबींचा सखोल विचार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवीपर्यंत मर्यादित न ठेवता त्यांच्या सामाजिक, बौद्धिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे हेच या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. देशातील सुमारे २० टक्के



विद्यार्थी केंद्रीय विद्यापीठांमध्ये तर ८० टक्के विद्यार्थी राज्य विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असल्यामुळे या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी राज्य विद्यापीठांमधून होणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणातून सर्वगुणसंपन्न पिढी घडविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे हे विद्यापीठांचे प्रमुख ध्येय असून मराठवाड्यातील विद्यार्थी अत्यंत गुणवंत आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, आयक्यूएसी संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, डॉ. संतराम मुंडे, डॉ. संगीता माकोने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची प्रस्तावना प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केली, तर सूत्रसंचालन आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांनी केले.

## सण, उत्सवात ध्वनिक्षेपक वापराची सूट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ फेब्रूवारी-**

आगामी सण, उत्सवात ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियमान्वये ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादी वापराबाबत श्रोते गृहे, सभागृहे सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या. बंद जागा खेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निवडीनुसार वर्षामध्ये १५ दिवस सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सुट जाहिर करता येईल, असे आदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहेत.

**जाहिर प्रगटन**
**नोंदीचा प्रकारःखरेदी**

माहिती मिळाल्याचा दि.०९/०२/२६फेरफाराचा दि.१०/०२/२६लिहून देणारःसूभाष भास्करराव बिंदू रा.भोकर खाता क्र.९४३यांचे गट/सर्व्हे क्र.५५४लागवडीयोग्य क्षेत्र १.४८४४हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी सदरील गट क्र.५५४मधील क्षेत्र ०.०२२२ सूभाष भास्करराव बिंदू रा.भोकर यांनी दस्त क्रमांक ९४७ दि.०३/०६/२०१४ रोजी प्रयागबाई पूंडलिकराव थळंगे यांना विक्रि केला पूढे तोच प्लॉट मधील क्षेत्र ०.०२२२ पैकी क्षेत्र ०.०१११ प्रयागबाई पूंडलिकराव थळंगे यांनी दस्त क्र,१३०५ दि.१८/०९/२०१७ रोजी यज्ञेश लक्ष्मीकांत भोकरकर यांना विक्रि केला असून गट क्र.५५४ मध्ये प्लॉटींग असून खरेदीखतावर गट क्र.नसल्यामूळे ग्राममहसूल अधिकारी यांनी दि.०२/०२/२०२६ रोजी जायमोक्यावर जाऊन पंचासमक्ष पंचनामा केला करिता नोंद घेण्यात आली मंजूरीस्तव सादर

संमती देणारे खातेदारःप्रयागबाई पूंडलिकराव थळंगे (खाता क्रमांकः०)दस्त क्र ९४७ दि.०३/०६/२०१४ लिहून घेणारःयज्ञेश लक्ष्मीकांत भोकरकर(११५५४)गट/सर्व्हे क्रमांक ५५४लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११ हे.आर. चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर,चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक १३०५दि.१३/०९/२०१७ प्रमाणे रक्कम रुपये ३६०००० घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं.७/१२ वर दाखल केले. ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**

# राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त कर्मयोगी प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ फेब्रूवारी-**

महाराष्ट्र ही संतांची पुण्यभूमी आहे. अशा या पुण्यभूमीत अनेक संत-महात्मे होऊन गेले.त्यातीलच एक महान संत म्हणजे राष्ट्रसंत गाडगेबाबा, समस्त मानव जातीची सेवाभावी वृत्तीने निरपेक्ष सेवा करून त्यांना अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी, परंपरा यांच्या जोखडातून बाहेर काढण्याचे महान कार्य त्यांनी केले. त्यांनी प्रत्यक्ष हातात झाडू घेऊन 'स्वच्छते'चा महामंत्र संपूर्ण देशाला दिला. सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने राज्यातील लोककला, लोकपरंपराचे जतन व संवर्धन व्हावे तसेच नवीन पिढीला आपल्या उच्च संस्कृतीची व परंपरेची ओळख नव माध्यमातून व्हावी या उद्देशाने मा.सांस्कृतिक कार्य मंत्री, ड. आशिष शेलार यांच्या अभिनव कल्पनेतून व सचिव सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्य शासनाच्या वतीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर



करण्यात येत आहे

संत गाडगेबाबा याच्या १५०व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने कर्मयोगी या प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता कुसुम सभागृह नांदेड येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात महाराष्ट्रातील प्रसिद्ध प्रबोधनकार व सप्तखंजीरी वादक श्री पवन महाराज दवंडे,अमरावती यांचे प्रबोधन होणार आहे. तसेच स्थानिक कलाकार रविराज भद्रे यांचा गीत गायनाचा कार्यकम सादर होणार आहे. प्रमुख आकर्षण म्हणजे मंजुषा शिंदे यांचे प्रबोधनात्मक गायन असणार आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड. अशिष शेलार यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन होत असून या सांस्कृतिक कार्यक्रमास शहरातील महापौर, प्रशासकीय अधिकारी व स्थानिक कलाकार प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमास शहरातील विविध सामाजिक संस्था, जेष्ठ नागरिक संघ,महिला मंडळ,भजनी मंडळ, प्रबोधनाच्या क्षेत्रात कार्यरत समाजसेवक लोककलावंत व नागरीकांनी या कार्यक्रमास उपस्थिती द्यावी असे आवाहन सांचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांनी केले आहे.

**भोकर नगरपरिषद, भोकर जि. नांदेड**
मुख्य प्रशासकीय इमारत
साईबाबा पेट्रोलपंप समोर, नांदेड रोड, भोकर ता. भोकर जि. नांदेड-४३१८०१

Email: - cobhokargmail.com दुरध्वनी क्रमांक कार्यालय (०२४६७) २२२२९९-२२३३९९

जा.क्र. ८६० दिनांक : १७ फेब्रुवारी २०२६

**ई-निविदा सूचना**
**(स्वच्छता विभाग)**
**(२०२५-२६)**

मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि. नांदेड यांच्या वतीने भोकर नगरपरिषद अंतर्गत भोकर शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प नगर परिषद भोकर येथे जुन्या साचलेल्या कचऱ्याचे शास्त्रोक्तरित्या (बायोमायनींग प्रक्रियेव्दारे) विल्हेवाट लावणे या कामाची निविदा तांत्रिक कारणांमुळे नव्याने प्रसिद्ध करण्यात येत असून सदरची ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. १८/०२/२०२६ ते दि २५/०२/२०२६ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

दिनांक- १७/०२/२०२६

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद भोकर**
**जि. नांदेड**

# ४ गुंठे शेतीमध्ये बेकायदेशीर अफू लागवडीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचा छापा

## १ क्विंटल ७७ किलो अफूसह ३ लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

वसमत तालुक्यातील सिरळी शिवारात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका शेतात टाकलेल्या छाप्यात ३ लाख ५४ हजार रूपये किंमतीची १ क्विंटल ७७ किलो वजनाची अफुची झाडे जप्त केली आहेत. याप्रकरणी एका व्यक्तीविरूध्द मंगळवार दि १७ फेब्रुवारी रोजी कुरूंदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी एका व्यक्तीला ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि १६ फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कुरूंदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजे सिरळी शिवारात एका शेतामध्ये अवैधरित्या अफुची लागवड केली आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, यांच्या पथकाने सिरळी शेत शिवारात छापा मारला असता सदर ठिकाणी प्रताप सुरेश नलगे रा सिरळी ता वसमत यांच्या ताब्यातील अंदाजे ४ गुंठे शेतीमध्ये लसणाच्या पिकात बेकायदेशीर अफुची लागवड केल्याचे मिळून आले. शेतमालक प्रताप नलगे यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता सदर अफुची झाडे विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे लागवड केल्याचे सांगितले. सदर अफुचे बोंडे, फुले असलेले झाडाचे राजपत्रीत अधिकारी व पंचासमक्ष वजन केले असता त्याचे वजन १ क्विंटल ७७ किलो ४५ ग्रॅम अंदाजे किंमत ३ लाख ५४ हजार ९०० रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने कायदेशीरित्या फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी पथकाच्या मदतीने सद मुद्देमाल जप्त करण्यात आला असून शेत मालक प्रताप नलगे वय ४२ व्य शेती. यास ताब्यात घेवून त्यांच्याविरूध्द कुरूंदा पोलिस ठाण्यात एनडीपीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, सपानि कारामुंगे, अंमलदार भुजंग कोकरे, गजानन पोकळे, ज्ञानेश्वर गोरे, साईनाथ कंठे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, किशोर सावंत, संदीप टाक, साठे यांच्या पथकाने केली आहे.

# आजपासून पुसेगावात आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवाला प्रारंभ

## १८ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी पर्यंत कार्यक्रम होणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

सेनगाव तालुक्यातील पुसेगाव येथे आजपासून आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवाला भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण सुरुवात झाली आहे. दि. १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान हा भव्य धार्मिक सोहळा संपन्न होणार असून संपूर्ण परिसरात आध्यात्मिक उत्साहाची लहर निर्माण झाली आहे.

महोत्सवानिमित्त आयोजकांकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. सुमारे १५ ते २० एकर विस्तीर्ण परिसरात आकर्षक मंडप उभारण्यात आला असून मुख्य वेदीची भव्य सजावट करण्यात आली आहे. धार्मिक विधींसाठी स्वतंत्र व्यवस्था, प्रकाशयोजना, ध्वनीव्यवस्था तसेच भाविकांसाठी सुयोग्य बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी राहण्याची व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे १०० ते १५० सर्व सुविधांनी युक्त खोल्यांची व्यवस्था करण्यात आली असून पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छता, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षा यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

यावेळी विभवसागरजी महाराज यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, पंचकल्याणक महोत्सव हा जैन धर्मातील अत्यंत पवित्र व महत्त्वपूर्ण धार्मिक सोहळा आहे. या सोहळ्यात तीर्थंकरांच्या गर्भ, जन्म, दीक्षा, केवलज्ञान आणि मोक्ष या पंचकल्याणकांचे विधीपूर्वक स्मरण व पूजन केले जाते. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याने सर्व नियोजन काटेकोरपणे करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने अशोक घारगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, नर्सी पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वाहतूक सुरळीत राहावी व भाविकांची सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी ठिकठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

महोत्सव काळात विविध धार्मिक विधी, प्रवचने व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून पुसेगाव नगरीत या निमित्ताने सर्वत्र भक्तीमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता असून हा महोत्सव ऐतिहासिक ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

कार्यक्रमासाठी देशाचे गृहमंत्री अमित शहा तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीची शक्यता व्यक्त होत आहे; मात्र त्यांच्या भेटीची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. या कार्यक्रमास विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्यासह दिक्षार्थी ब्र. भारतजी उपाध्ये, सह प्रतिष्ठाचार्य पं. अथर्व मुलावा यांचीही प्रमुख उपस्थिती असणार आहे.

दि १८ फेब्रुवारी रोजी गर्भ कल्याणक, दि १९ फेब्रुवारी रोजी जन्म कल्याणक, दि २० फेब्रुवारी रोजी तप कल्याणक, दि २१ फेब्रुवारीला केवलज्ञान कल्याणक, दि २२ फेब्रुवारीला मोक्ष कल्याणक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आयोध्या पीठाधीश रवींद्रकिर्ती स्वामी, ब्र. सी आर पाटील, सुनील अजमेरा, कैलासचंद चांदीवाल, सुमेरकुमार काला, अनुराग जैन यांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आंतरराष्ट्रीय पंच कल्याणक प्रतिष्ठा महोत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# औंढा नागनाथ येथे आज रथोत्सव सोहळा, भाविकांसाठी पर्वणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**



औंढा नागनाथ येथील नागनाथ मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त बुधवारी (ता.१८ ) हजारो भाविकांच्या उपस्थितीत रथोत्सव होणार आहे. त्याची जय्यत तयारी झाली आहे.महाशिवरात्री यात्रेनिमित्त मंदिरात आठवडाभरापासून विविध कार्यक्रम सुरू आहेत. बुधवार रात्री दहाला रथोत्सव होईल. मंदिर संस्थानचे कर्मचारी रथ ओढणार असून, मंदिराला पाच प्रदक्षिणा घातल्या जातील. ह भ प नामदेव महाराज ढवळे चारठाणकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने गुरुवारी (ता.१९) उत्सवाची सांगता होणार आहे. या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन संस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे, विश्वस्त ॲड श्रीधर घुगे, देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ यांनी केले आहे. दरम्यान, रथोत्सवाला होणारी गर्दी लक्षात घेता मोठा पोलिस बंदोबस्त तैनात असणार आहे, असे पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांनी सांगितले. याशिवाय परिसरावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असेल.

महाशिवरात्री यात्रेनिमित्त नगरपंचायतीतर्फे बुधवारी सकाळी अकराला कुस्ती स्पर्धा होतील. प्रथम ३२ हजार २२६ रुपये, द्वितीय २२ हजार २२६ रुपये, तृतीय १२ हजार २२६ रुपये अशी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षिसे दिली जाणार आहेत, अशी माहिती मुख्याधिकारी रविराज दरक यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त

### मुख्याध्यापाक जोसेफ यांना भारत भूषण पुरस्कार



हिंगोली- शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कै. नारायणराव रावते शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित ए बी एम इंग्लिश हायस्कूल येथील कार्यरत मुख्याध्यापक जोसेफ के.जे . यांना प्रतिष्ठेचा 'भारत भूषण' पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स आणि नीती आयोग यांच्या संयुक्त विद्यमानाने अहिल्यानगर येथे देण्यात आला. याचे औचित्य साधून शाळेमध्ये संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर, उपमुख्याध्यापक आदेश बोराळकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत त्यांना पुनश्च एकदा सन्मानित करण्यात आले. त्यांच्या शैक्षणिक नेतृत्वामुळे, नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे आणि विद्यार्थीकेंद्रित धोरणांमुळे हा सन्मान मिळाला आहे. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी विकसित व्हावी यासाठी प्रकल्पाधारित शिक्षण, डिजिटल अध्यापन पद्धती, नियमित शैक्षणिक मूल्यमापन तसेच स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेचा दहावीचा निकाल सातत्याने उंचावत असून अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत स्थान पटकावत आहेत. तसेच सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण जनजागृती, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे आणि पालक-शिक्षक सहभाग कार्यक्रम यांसारखे उपक्रमही त्यांनी यशस्वीपणे राबविले.

### वसतीगृहातील मुलींना दामिनींचे मार्गदर्शन



हिंगोली- नवीन मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, हिंगोली तसेच मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह, हिंगोली येथे दामिनी पथकाच्या वतीने मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात दामिनी पथकाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती प्रेमा जगताप, व महिला पोलीस श्रीमती आरती साळवे यांनी वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थिनींना सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या वेळी गृहपाल सुलोचना विष्णू ढोणे यांच्यासह वसतिगृहातील कर्मचारी तसेच सुमारे २०० विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# वसमतला दोन महिला उपनिरीक्षक असूनही शहरात टवाळखोर मोकाटच

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

शहरात पोलिसांचे महिला फिरते पथक सध्या प्रत्यक्षात दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. ग्रामीण भागातून शिक्षण, प्रशिक्षण तसेच खाजगी शिकवणी वर्गासाठी शहरात मोठ्या प्रमाणात मुलींची ये-जा असते. मात्र या मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस ऐरणीवर येत आहे.

शाळा व महाविद्यालयाच्या वेळेत शहरातील विविध भागांत टवाळखोर ट्रिपल सीट दुचाकीवरून फिरत असून कर्णकर्कश आवाजात हॉर्न वाजवत मुलींना त्रास देत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही ठिकाणी छेडछाडीचे प्रकार घडत असल्याचेही बोलले जात आहे. मात्र भीतीपोटी अनेक मुली तक्रार देण्यास पुढे येत नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. एकीकडे पोलिस दलाकडून 'दामिनी पथक', 'चिडीमार पथक', 'महिला फिरते पथक', 'पोलीस दीदी' अशा विविध उपक्रमांची माहिती दिली जाते. मात्र वसमत शहरात या पथकांची प्रत्यक्ष उपस्थिती जाणवत नसल्याने नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे वसमत शहरात दोन महिला पोलीस उपनिरीक्षक कार्यरत आहेत. मात्र छेडछाड, टवाळखोरांचे प्रकार तसेच ट्रिपल सीट दुचाकींच्या दहशतीवर ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात आहे. त्यामुळे महिला सुरक्षेसाठी नेमकी कोणती पावले उचलली जात आहेत? असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, शहरातील शाळा, महाविद्यालय परिसर, बसस्थानक परिसर तसेच मुख्य चौकात नियमित गस्त वाढवून टवाळखोरांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी पालकवर्गातून होत आहे. आता पोलीस अधीक्षकांकडून महिला उपनिरीक्षकांना शहरातील दोन भागांमध्ये जबाबदारी निश्चित करून कारवाईचे आदेश दिले जातील का, याकडे लक्ष लागले आहे.

# पुसेगाव येथे पंचकल्याणक महोत्सवात क्षुल्लक श्री व्रत सागरजी यांचे समाधी मरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**



सेनगाव तालुक्यातील पुसेगाव येथील सर्वज्ञ तीर्थ पुसेगाव येथे १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान आयोजित अंतराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवानिमित्त देशभरातून जैन मुनींचे मोठ्या संख्येने आगमन झाले आहे. या धार्मिक वातावरणात एक अत्यंत भावनिक घटना घडली.

आचार्य श्री १०८ विभवसागरजी महाराज यांच्या सानिध्यात त्यांचे शिष्य क्षुल्लक श्री व्रत सागरजी महाराज यांनी पुसेगाव येथे समाधी मरण स्वीकारले. त्यांच्या समाधीमुळे संपूर्ण परिसरात शोकाकुल वातावरण निर्माण झाले असूनही, ते एक आध्यात्मिक परमोच्च क्षण मानला जात आहे.

मुळचे इंदौर येथील रहिवासी असलेले श्री व्रत सागरजी महाराज यांनी पूर्वी इंदौर पोलीस दलात पोलीस निरीक्षक पदावर उल्लेखनीय सेवा बजावली होती. शासकीय सेवेतून निवृत्तीनंतर त्यांनी सांसारिक जीवनाचा त्याग करून आचार्य श्रींकडून दीक्षा घेत धर्ममार्ग स्वीकारला. त्यानंतर त्यांनी संयम, साधना आणि तपश्चर्येच्या मार्गावर आपले जीवन अर्पण केले.

रविवारी समाधी लागल्यानंतर त्यांची अंतिम यात्रा संपूर्ण पुसेगाव गावातून भक्तिमय वातावरणात काढण्यात आली. मोठ्या संख्येने जैन समाज बांधव, ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते. त्यानंतर श्री सुभाष कान्हेड यांच्या शेतामध्ये धार्मिक विधीपूर्वक अंत्यसंस्कार करण्यात आले.

पंचकल्याणक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर घडलेली ही घटना भाविकांसाठी अत्यंत वेदनादायी असली तरी संतांच्या समाधीमरणाला मोक्षमार्गातील सर्वोच्च साधना मानत समाजबांधवांनी श्रद्धांजली अर्पण केली.

# अखंड हरिनाम सप्ताहात सापडलेली सोन्याची पोथ केली परत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

श्रीक्षेत्र सोडेगाव येथे श्री संत भोलागिरी महाराज यांच्या ६२ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या समारोपदिनी काल्याचे कीर्तन व महाप्रसाद कार्यक्रमादरम्यान सोन्याची नऊ पानांची मनी असलेली पोथ, अंदाजे १ लाख ६० हजार रुपये किमतीची, यात्रेदरम्यान सापडली. ही मौल्यवान वस्तू देवस्थान संस्थांचे अध्यक्ष बाळासाहेब गोविंदराव पाटील यांचे बंधू माधव गोविंदराव पाटील यांना सापडली. मौल्यवान वस्तू स्वतःजवळ न ठेवता त्यांनी तत्काळ ही बाब संस्थानच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर आयोजकांकडून सर्वत्र जाहीर आवाहन करण्यात आले की, संबंधित व्यक्तीने योग्य ओळख पटवून पोथ स्वीकारावी. तपासणीनंतर ती सोन्याची पोथ शंकरराव बेले यांची असल्याचे स्पष्ट झाले. योग्य खातरजमा करून ती पोथ त्यांना परत देण्यात आली. या घटनेमुळे सोडेगावमध्ये प्रामाणिकपणाचा जिवंत आदर्श समोर आला आहे. या घटनेमुळे समाजात अजूनही सदसद्विवेकबुद्धी जिवंत असल्याचा विश्वास दृढ झाला आहे. गावकऱ्यांकडून माधव गोविंदराव पाटील यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांचा हा आदर्श समाजातील तरुण पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# जलेश्वर मंदिराजवळील चिमणी बाजाराचे मंगळवारा भागात स्थलांतर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**



शहराची जुनी परंपरा असलेला आणि स्थानिक शेतकऱ्यांची ओळख असलेला 'चिमणी बाजार' आता मंगळवारा बाजार पेठेत पूर्ण क्षमतेने भरू लागला आहे. नगर पालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या नियोजनामुळे हा बाजार आता अधिक सुटसुटीत झाला असून, भाजीपाला विक्रेते आणि ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. दर मंगळवारी भरणारा हा बाजार प्रामुख्याने शेतकरी बाजार म्हणून ओळखला जातो. स्थानिक शेतकरी आपला शेतातला ताजा भाजीपाला थेट ग्राहकांना विकण्यासाठी येथे येतात. अत्यंत कमी किंमतीत आणि ताज्या मालासाठी हा बाजार प्रसिद्ध असल्याने याला स्थानिक भाषेत 'चिमणी बाजार' असे नाव पडले आहे. तसेच विविध प्रकारच्या डाळी, गहू, ज्वारी, बाजरीसह जीवनाश्यक वस्तू या बाजारात खरेदी करण्यासाठी मध्यमवर्गीयासह गोरगरीब लोक येत असतात. मंगळवारा बाजार पेठ ही मोठी आणि मोकळी असल्याने, आता शेतकऱ्यांना आपला माल मांडण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध झाली आहे. नगर पालिकेने येथे स्वच्छतेचे आणि बसण्याचे योग्य नियोजन केल्याने ग्राहकांचा प्रतिसादही वाढला आहे. जलेश्वर मंदिर परिसरात जागा मिळेनाशी झाली होती. मंगळवारा पेठेत मोकळेपणाने व्यापार करता येत आहे, अशी भावना स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.